रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १६ ◆ अंक ३४५
www.ramprahar.com

मंगळवार, २ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

म्हसळ्यात गोवंशाची हत्या करणाऱ्या चौघांना अटक/२
माटवण आदिवासीवाडीवर दरडीची टांगती तलवार/५
रोह्यात रंगली पावसाळी रबर बॉल क्रिकेट स्पर्धा/८

## राज्यात जुलैमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज



**पुणे :** मोसमी पावसासाठी पोषक वातावरण आहे. पुढील तीन दिवसांत देशाच्या उर्वरित भागात मोसमी पाऊस दाखल होईल तसेच जुलै महिन्यात राज्यासह देशभरात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागानुसार प्रशांत महासागरातील एल-निनो तटस्थ अवस्थेत गेला आहे. ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात ला-निना स्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे, तर हिंदी महासागरातील द्वि धुव्रिता सध्या तटस्थ आहे. मोसमी पावसासाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे जुलै महिन्यात देशभरात सरासरीच्या १०६ टक्के पावसाचा अंदाज आहे. जुलै महिन्यात देशात सरासरी २८०.४, तर राज्यात सरासरी ३६२.३ मिमी पाऊस पडतो. यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज आहे. राजस्थान आणि पंजाबचा वायव्य भाग वगळता मोसमी पावसाने देशाचा सर्व भाग व्यापला आहे.

### कोकण पदवीधर मतदारसंघ निवडणूक

# भाजपच्या निरंजन डावखरेंची विजयी हॅट्ट्रिक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघात भाजप महायुतीचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांनी सलग तिसऱ्यांदा मोठा विजय मिळवत हॅट्ट्रिक केली आहे. त्यांनी प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीकडून लढणारे काँग्रेस उमेदवार रमेश कीर यांचा पराभव केला. नवी मुंबईतील नेरूळ येथे सोमवारी (दि. १) मतमोजणी झाली.



आमदार डावखरे यांनी प्रचारात आघाडी घेतली होती तसेच त्यांना विविध संस्था, संघटनांनी उत्स्फूर्तपणे पाठिंबा दिला होता. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात होता. या मतदारसंघात भाजपकडून विद्यमान आमदार डावखरे, तर रमेश कीर हे काँग्रेसचे उमेदवार होते. त्याचप्रमाणे इतरही उमेदवार असले तरी मुख्य लढत डावखरे आणि कीर यांच्यात होती. यामध्ये डावखरेंनी किर यांना एकतर्फी मात दिली.

या निवडणुकीत एकूण एक लाख ४३ हजार २९७ मतदारांनी मतदान केले होते. त्यापैकी एक लाख ३२ हजार ७१ मते वैध, तर ११ हजार २२६ मते अवैध ठरली. जिंकून येण्यासाठी ६६ हजार ३६ इतक्या मतांचा कोटा ठेवण्यात आला. यामध्ये आमदार निरंजन डावखरे हे पहिल्या पसंतीची एक लाख ७१९ मते मिळवून विजयी झाले, तर रमेश कीर यांना अवघी २८ हजार ५८५ मते पडली.

आमदार निरंजन डावखरे २०१२पासून कोकण पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. यंदा ते सलग तिसऱ्यांदा निवडणूक लढवत होते. त्यांनी प्रचंड बहुमताने विजय मिळवला. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# राहुल गांधींनी हिंदूबद्दल केलेल्या वक्तव्यावरून लोकसभेत खडाजंगी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी (दि. १) संसदेच्या अधिवेशनामध्ये बोलताना हिंदूबद्दल वक्तव्य केले. यावरून लोकसभा सभागृहात खडाजंगी पहायला मिळाली. राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करताना जे स्वतः ला हिंदू म्हणवतात ते हिंसा, द्वेष पसरवणे आणि असत्य गोष्टी करीत आहेत, असे विधान केले. यावर संपूर्ण हिंदू समाजाला हिंसक बोलणे गंभीर असल्याचे म्हणत पंतप्रधान मोदींनी पलटवार केला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदीय अधिवेशनादरम्यान केलेल्या अभिभाषणावर लोकसभेत सोमवारी चर्चा सुरू होती. लोकसभेचे विरोधी पक्षनेते बनल्यानंतर राहुल गांधी यांनी यानिमित्ताने पहिल्यांदाच भाषण केले. या वेळी त्यांनी पंतप्रधान मोदींना लक्ष्य करताना हिंदुत्वावरही टीका केली. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी म्हटले, याच संविधानाने मला शिकवलंय की विरोधी पक्षनेत्याला गांभिर्याने घेणे गरजेचे आहे.



## शिवसेना, राष्ट्रवादीच्या खासदारांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित खासदारांनी सोमवारी (दि. १) नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाल्याबद्दल सर्व खासदारांनी मोदींचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

खासदारांनी पंतप्रधान मोदींना विठ्ठल रखुमाईची मूर्ती भेट दिली. पंतप्रधानांनी भेटीदरम्यान अर्धा तास खासदारांसोबत चर्चा केली आणि महाराष्ट्रातील विकासकामांचा आढावा घेतला. खासदारांनी सकारात्मक आणि सक्रिय भूमिका ठेवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातच पेपरफुटीसंदर्भात कायदा आणणार -फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**



स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने पेपरफुटीसंदर्भात केंद्र सरकारने कायदा केला आहे. राज्यातही पेपरफुटी व गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी कायदा आणण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १) प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागांतर्गत राजपत्रित पदांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. फेरपरीक्षा घेण्याबाबत व संबंधित गैरप्रकार रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत मृद व जलसंधारण विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. ही परीक्षा टीसीएस व आयबीपीएसतर्फे होईल.

# विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंचे सभागृहात असंविधानिक वर्तन

### आमदार प्रसाद लाड यांना केली शिवीगाळ

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा सोमवारी (दि. १) सभागृहात तोल सुटला आणि त्यांनी भाजप आमदार प्रसाद लाड यांना शिवीगाळ केली. वर प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना आमदार लाड यांना उद्देशून धमकीची भाषा वापरली. विरोधी पक्षनेते दानवे यांच्या या कृत्याबद्दल सखेद आश्चर्य तसेच निषेध व्यक्त होत आहे.



याबद्दल विधिमंडळ परिसरात माध्यमांशी संवाद साधताना आमदार प्रसाद लाड यांनी सांगितले की, राहुल गांधी यांनी लोकसभेत बोलताना हिंदुत्वाबाबत जे विधान केले आहे, त्यावर विधान परिषदेत बोलताना मी राहुल गांधींच्या निषेधाचा ठराव मांडत तो लोकसभेत पाठवावा तसेच त्यावर विरोधी पक्षनेत्यांनी उत्तर द्यावे, अशी मागणी केली. त्यानंतर अंबादास दानवे हे उत्तर देण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी माझ्याशी गैरव्यवहार करण्यास सुरुवात केली. त्यांनी मला आई-बहिणीवरून शिवीगाळ केली. दानवे यांनी हिंदुंचा अपमान केला असून त्यांनी सभागृहाची माफी मागावी, अशी मागणीही आमदार लाड यांनी या वेळी केली.

दरम्यान, प्रसाद लाड यांच्या आरोपावर अंबादास दानवे यांनी प्रतिक्रिया दिली, मात्र त्यातही त्यांची मुजोरी दिसून आली. विधान परिषदेत बोलताना माझा तोल सुटलेला नाही. मी एक शिवसैनिक आहे. जो माझ्यावर बोट दाखवेल, त्यांची बोटे छाटण्याची ताकद माझ्यात आहे, अशी धमकीची भाषा त्यांनी केली. त्यामुळे केंद्राबरोबरच राज्यातही विरोधी पक्षनेत्यांचा तोल सुटल्याची चर्चा आहे.

## निवडक

### अल्पवयीन आरोपीच्या जामिनाला पुणे पोलीस देणार आव्हान

**पुणे :** येथील पोर्शे कार अपघात प्रकरणात महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मागच्या आठवड्यात अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला मुंबई उच्च न्यायालयाने जामीन दिला होता. या जामिनाला विरोध करण्यासाठी आता पुणे पोलिसांना सर्वोच्च न्यायालयात जाण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिरवा कंदील दाखविला आहे. सर्वोच्च न्यायालयात जाण्याची परवानगी पुणे पोलिसांनी राज्य सरकारकडे मागितली होती. ती देण्यात आली आहे.

### बदनामी प्रकरणात मेधा पाटकर यांना कारावास, दंडाची शिक्षा

**नवी दिल्ली :** नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या आणि सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्लीच्या न्यायालयाने पाच महिने साधा कारावास आणि १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. लेफ्टनंट गव्हर्नर विनयकुमार सक्सेना यांनी दाखल केलेल्या २००३मधील मानहानीच्या खटल्यात पाटकरांना ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. या निर्णयाविरोधात त्या १ ऑगस्टपर्यंत अपील करू शकतात.

# ताम्हिणीतील धबधब्यात घेतली उडी

- राष्ट्रीय खेळाडूने गमावला जीव
- भोसरीच्या तरुणाचा व्हिडीओ व्हायरल



**पुणे : प्रतिनिधी**

वर्षा पर्यटनासाठी लोणावळ्यातील भुशी डॅम परिसरात गेलेल्या पाच जणांचा वाहून जात मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना पुण्याच्याच ताम्हिणी घाटातील एक दुर्घटना समोर आली आहे. ताम्हिणी घाटातील धबधब्यात उडी मारलेल्या एका तरुणाचा बुडून मृत्यू झाला आहे. स्वप्नील धावडे असे त्याचे नाव असून या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार स्वप्नील धावडे (रा. पिंपरी चिंचवड) हा तरुण जिममधील ३२ जणांच्या ग्रुपसोबत शनिवारी ताम्हिणी घाटात फिरण्यासाठी गेला होता. स्वप्नीलने प्लस व्हॅली येथील धबधब्यातील पाण्यात उडी मारल्यानंतर तो जोरदार प्रवाहात बेपत्ता झाला.

पौड पोलीस, ताम्हिणी वनविभाग, मुळशी आपत्ती व्यवस्थापन समिती, शिवदुर्ग टीमने आसपासच्या परिसरात स्वप्नीलचा शोध घेतला, मात्र तो सापडला नाही. रविवारी दुसऱ्या दिवशीही शोधकार्यात त्याचा तपास लागला नाही. अखेर सोमवारी (दि. १) सकाळी स्वप्नीलचा मृतदेह रायगड जिल्ह्यातील माणगावमध्ये आढळून आला.

स्वप्नील धावडे हा बॉक्सिंगमध्ये राष्ट्रीय खेळाडू राहिला आहे. त्याच आधारे तो भारतीय सैन्यात दाखल झाला. १८ वर्षांच्या सेवेनंतर तो मागील वर्षी निवृत्त झाला होता.

# विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवार जाहीर

### पंकजा मुंडेंसह पाच जणांना संधी



पंकजा मुंडे | सदाभाऊ खोत | परिणय फुके | योगेश टिळेकर | अमित गोरखे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ११ जागांसाठी या महिन्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत निसटता पराभव झालेल्या पंकजा मुंडे यांच्यासह एकूण पाच जणांना भाजपने उमेदवारी जाहीर केली आहे.

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ही २ जुलै आहे. तत्पूर्वी सोमवारी (दि. १) भाजपकडून आपल्या विधान परिषद उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहेत. त्यामध्ये अपेक्षेप्रमाणे पंकजा मुंडे यांना विधान परिषदेसाठी संधी दिली गेली आहे. सोबतच विदर्भातून परिणय फुके, तर पुण्यातून योगेश टिळेकर व अमित गोरखे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्याबरोबरच महायुतीमधील मित्रपक्षांमधून सदाभाऊ खोत यांनाही भाजपने संधी दिली आहे. त्यामुळे खोत यांनी भाजप नेत्यांचे आभार मानले आहेत.

विधान परिषदेचे हे आमदार विधानसभा सदस्यांमार्फत निवडले जाणार आहेत. त्यामध्ये महायुतीचे संख्याबळ पाहता भाजपचे पाच उमेदवार विजयी होऊ शकतात. त्यानुसार भाजपने पाच जणांना आपल्याकडून संधी दिली आहे.

सध्याचे विधानसभेतील पक्षीय बलाबल पहायचे झाल्यास भाजपचे १०३ आमदार आहेत, तर भाजपचे महायुतीमधील मित्र पक्ष असलेल्या शिवसेनेचे ३७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ३९ आमदार आहेत. त्याशिवाय इतर छोटे पक्ष नऊ आणि अपक्ष १३ असे एकूण २०१ आमदारांचे पाठबळ महायुतीकडे आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीत काँग्रेसकडे ३७, ठाकरे गट १५, शरद पवार गट १३ आणि शेकाप व अपक्ष प्रत्येकी एक असे मिळून ६७ सदस्य आहेत. त्यामुळे सध्याच्या गणितानुसार विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे नऊ, तर महाविकास आघाडीचे दोन आमदार निवडून येऊ शकतात, मात्र एखादा अतिरिक्त उमेदवार रिंगणात उतरल्यास ही निवडणूक रंगतदार होऊ शकते.

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी निवडणुकीची मतदान प्रक्रिया १२ जुलै रोजी होणार आहे. निकालही त्याच दिवशी जाहीर होईल. यासाठी उमेदवार जाहीर करून भाजपने आघाडी घेतली आहे.

# कर्जतमध्ये आढळली कातळावरील कोरीव चित्रे

**कर्जत : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी कर्जत तालुक्यातील वेणगावच्या हद्दीत मंकला खेळाचे १८ कोरीव पट आढळल्याची घटना ताजी असतानाच इतिहास अभ्यासक आणि संशोधक सागर सुर्वे आणि नेत्रा कनोजे यांना त्या स्थळापासून काही अंतरावर प्राचीन अशी कातळावर कोरलेली चित्रे दिसून आली आहेत.



या कातळावर प्राणी कोरलेले असून प्राथमिकदृष्ट्या ते बैल असल्याचे मत सागर सुर्वे यांनी मांडले आहे. याचा काळ पुरातन असून त्या संबंधी अधिक संशोधन सुर्वे करीत आहेत. कातळावर कोरलेल्या या चित्रांमुळे कर्जतच्या इतिहासात मोलाची भर पडलेली आहे. या संशोधनात मनीष सोनावळे आणि भगवान मुंढे यांची मदत लाभली. कोरीव चित्रांवर अधिक संशोधन करून त्यासंबंधी लवकरच संशोधन पेपर मांडणार असल्याचे मत नेत्रा कनोजे यांनी व्यक्त केले.

सातवाहन काळापासून कल्याण बंदरात येण्या-जाण्यासाठी जी व्यापारी वाट होती ती याच कर्जत परिसरातून गेली होती. याबाबतचा उल्लेख शिलाहार काळात (बाराव्या शतकात) इथून प्रवास केलेल्या ग्रीक प्रवाशानेसुद्धा केला होता. त्यासंबंधी असलेली नोंद इतिहास अभ्यासक सुर्वे यांनी शोधून काढली आहे. ही कोरीव चित्रे व मंकला खेळाचे पट संवर्धित करण्यात यावेत यासाठी लवकरच शासनाकडे मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना मातृशोक



**नागपूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मातोश्री प्रभावती कृष्णराव बावनकुळे यांचे सोमवारी (दि. १) दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ७४ वर्षांच्या होत्या.

प्रभावती बावनकुळे या काही दिवसांपासून आजारी होत्या. स्थानिक खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात पती कृष्णराव, चार मुले, सुना, नातवंडे आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

दिवंगत प्रभावती बावनकुळे यांची अंत्ययात्रा मंगळवारी सकाळी १० वाजता त्यांच्या कोराडी येथील निवासस्थानावरून निघून कोलार घाट येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# रायगडच्या दोन बॅडमिंटनपटूंची चमक

### संघटनेचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्याकडून अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड बॅडमिंटन ऑरगनायझेशन आणि रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या वतीने योनेक्स सनसाईस रायगड डिस्ट्रिक बॅडमिंटन चॅम्पियनशीप आणि निवड चाचणी-२ नुकतीच झाली. यामध्ये गाथा सुर्यवंशी हिची चीन येथे होणाऱ्या आशियाई सब ज्युनिअर बॅडमिंटन चॅम्पियनशिपसाठी १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरी आणि दुहेरीसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली तसेच अनुष्का इप्टे हिला १५ वर्षांखालील मुलींच्या दुहेरीसाठी निवड चाचणीसाठी बोलावण्यात आले आहे.

या खेळाडूंचे रायगड बॅडमिंटन ऑरगनायझेशनचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत १८६ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे गाथा सुर्यवंशीची चीन येथे होणाऱ्या आशियाई सब ज्युनिअर बॅडमिंटन चॅम्पियनशिपसाठी निवड झाली, तर अनुष्का इप्टेला निवड चाचणीसाठी बोलावण्यात आले आहे. याबद्दल गाथा, अनुष्का तसेच स्पर्धेत सहभागी घेतलेल्या खेळाडूंचे परेश ठाकूर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

या वेळी माजी भारत बॅडमिंटनपटू निर्मला कोटणीस, रायगड बॅडमिंटन ऑरगनायझेशनचे रवींद्र भगत, शिवकुमार काराइल, नरेंद्र जोशी, प्रमोद काराइल यांच्यासह पदाधिकारी, खेळाडू उपस्थित होते.

# दिपनगर औष्णिक प्रकल्पातून ऑगस्टमध्ये वीज उत्पादन -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

जळगांव जिल्ह्यातील दिपनगर (ता. भुसावळ) येथील सुपर क्रिटीकल तंत्रज्ञानावर भेल (भारत हेवी इलेक्ट्रीक लिमिटेड) कंपनीकडून ६६० मेगाव्हॅट औष्णिक वीज प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. सध्या या प्रकल्पाच्या विविध चाचण्या सुरू आहेत. येत्या ऑगस्टमध्ये दिपनगर येथील प्रकल्पातून विजेचे उत्पादन सुरू होणार असून सप्टेंबर महिन्यात व्यावसायिक स्वरूपात प्रकल्पातून वीज मिळेल, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.१) विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

याबाबत सदस्य संजय सावकारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेमध्ये जितेंद्र आव्हाड, अमित देशमुख यांनीही सहभाग घेतला.



उत्तरात अधिकची माहिती देताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रकल्पाची चाचणी सुरू असताना बॉयलर ट्यूबमध्ये तांत्रिक दोष निर्माण झाला. बॉयलर ट्यूबला पाणीपुरवठा करावा लागतो, मात्र पाणीपुरवठा करणाऱ्या पंपामध्ये एक पंप बंद पडला. परिणामी पाणीपुरवठा कमी होऊन बॉयलर ट्यूबचे तापमान वाढले व तांत्रिक दोष निर्माण झाला. त्यानंतर या ट्यूबची तपासणी केली असता ट्यूबमध्ये मोठा तांत्रिक दोष निदर्शनास आला. हा चाचणी स्तर असल्यामुळे याची संपूर्ण जबाबदारी भेलची आहे. दोषपूर्ण यंत्रणेच्या जागी नवीन यंत्रणा भेलकडून बसविण्यात येणार आहे. भेल हा केंद्र शासनाचा उपक्रम असल्यामुळे या प्रकरणात भेलचा कुणी अधिकारी जबाबदार असल्यास, त्याविषयी कंपनीला कळविण्यात येईल. या प्रकल्पाच्या सर्व चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतरच प्रकल्पाचे हस्तांतरण करण्यात येईल.

राज्यात फॅक्टरी व बॉयलर निरीक्षकाची पदे रिक्त असल्यास, ही पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. बॉयलर तपासणीबाबत संगणीकृत कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. वर्षभरात मंजुरी प्राप्त असलेल्या ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनी भेट दिली पाहिजे. याबाबत कुठल्या दिवशी, कुणी, कुठे जायची याची रँडम पद्धत तयार केली आहे. त्यानुसार फॅक्टरीला भेट देऊन त्याच दिवशी निरीक्षणाचे अहवाल २४ तासाच्या आत संकेतस्थळावर अपलोड करावे लागतात, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# संत तुकाराम महाराजांच्या पालखीरथाचे मुख्यमंत्री शिंदे यांनी केले सारथ्य

**कर्जत : प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालखीरथाचे सारथ्य केले. तुकोबांची पालखी भक्ती शक्ती चौकमार्गे पिंपरी चिंचवड शहरात दाखल झाली. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चौकात तुकोबांच्या पादुकांचे दर्शन घेत मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यासमवेत रथाचे सारथ्य केले. इंद्रायणी स्वच्छता, वारकऱ्यांची सुविधा आणि पालखी मार्गाला जागतिक दर्जा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

संत तुकाराम महाराज ३३९वा पालखी सोहळा यावर्षी साजरा होत आहे. श्रीक्षेत्र देहू येथून पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान केले. पहिला मुक्काम इनामदार वाडा देहू येथे झाल्यानंतर शनिवारी पालखी पिंपरी चिंचवड शहरात दुसऱ्या मुक्कामासाठी आली. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भक्ती शक्ती चौकात तुकोबांच्या पादुकांचे दर्शन घेतले, तसेच पालखी रथाचे सारथ्य केले.



तत्पूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आळंदी येथे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यास उपस्थिती लावली. पालखी प्रस्थान सोहळ्यास उपस्थिती लावणारे एकनाथ शिंदे पहिले मुख्यमंत्री ठरले. आळंदी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन घेऊन इंद्रायणी नदी घाट परिसरातील स्वच्छतेची मुख्यमंत्र्यांनी पाहणी केली. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चोबे, आळंदी नगरपालिकेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे उपस्थित होते.

# 'मुंबई ते मोरा फेरीबोटीवरील समस्या तातडीने सोडवणार'

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई ते मोरादरम्यान सुरू असलेल्या फेरीबोटीचे ७५ टक्के प्रवासी कमी झाल्याने फेरीबोटीवाल्यांच्या ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत, त्याबाबत सविस्तर प्रस्ताव द्यावा. या बोटीवरील कामगारांच्या प्रश्नांबाबत बैठक घेऊन तातडीने उपाययोजना करण्यात येतील, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत सांगितले.

मुंबई ते मोरादरम्यान फेरीबोटीवरील कामगारांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत सदस्य रमेश पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला होता, त्यावर उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते.

शासनाकडे अद्याप फेरीबोटचालक कंपन्यांच्या अडचणींसंदर्भात कुठलाही प्रस्ताव किंवा निवेदन आलेले नाही, मात्र संबंधितांनी त्यांच्या समस्याबाबत निवेदन किंवा प्रस्ताव सादर करावा, त्यावर विचार करून तत्परतेने उपाययोजना केल्या जातील. या विषयाबाबत तातडीने बैठक घेऊन अडचणी सोडवल्या जातील, असे मंत्री पाटील यांनी सांगितले. या प्रश्नावरील चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जयंत पाटील, प्रवीण दरेकर आदी सदस्यांनी सहभाग घेतला.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. रविवारी (दि.३०) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २४० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख १० हजार ६०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# राजमाता जिजाऊंच्या विचारांचा वारसा जतन करावा –आमदार गोगावले

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांना हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी प्रेरित करणाऱ्या राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या विचारांचा वारसा जतन करावा. यासाठी शिवभक्तांनी वर्षातून एकदा तरी पाचाडची वारी करावी, असे आवाहन महाडचे आमदार भरत गोगावले यांनी केले.

राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या तिथीप्रमाणे पुण्यतिथीनमित्त रविवारी (दि.३०) पाचाड येथे राजिपच्या वतीने अभिवादन करण्यात आले. त्या वेळी आमदार गोगावले बोलत होते. या वेळी राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बस्टेवाड, माजी जि. प. सदस्य मनोज काळीजकर, संजय कचरे, राजिप माजी उपाध्यक्ष बाळकृष्ण राऊत, माजी सभापती सपना मालुसरे, महाड शिवसेना महिला आघाडी प्रमुख विद्या देसाई वडके, महाड उपविभागीय पोलीस शंकर काळे, पाचाड सरपंच सीमा बेंदुगडे, अनंत देशमुख, रघुवीर देशमुख, राजेंद्र खातू आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते जिजाऊंच्या समाधीस्थळी विधीवत पूजन करण्यात आले.

# म्हसळ्यात गोवंशाची हत्या करणाऱ्या चौघांना अटक

**म्हसळा : प्रतिनिधी**

तालुक्यात वारळ येथे पोलिसांनी गोवंशाची हत्या करून विक्रीसाठी ठेवलेले मांस जप्त केल्याची घटना सोमवारी (दि.१) सकाळी ७ वा.चे दरम्यान घडली. पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे.

याबाबत अक्षय दौलत पुरी यांनी माहिती दिल्यानंतर, म्हसळा पोलिसांचे पथक वारळ मोहल्यात आरोपी नवाज काजी याच्या घरी पोहचले. तेथे आरोपी नवाज काजी याच्यासह अन्य तीन आरोपी आणि गोवंशाची कत्तल केलेले मांस विक्रीसाठी ठेवल्याचे आढळले. पोलिसांनी तत्काळ नवाज काजीसह, जुनेद दाऊद काजी (वय ३७), मुनाफ रहीमतुल्ला मुकादम (वय ३९) व सकलेन मुश्ताक मुकादम (वय २०, सर्व रा. वारळ) यांना रंगेहाथ पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे ७० किलो मांस, विविध प्रकारचे १४ सुरे असे १६ हजार ५०० किमतीचे सामान पोलिसांनी जप्त केले.

ही मोहिमेत म्हसळा प्रभारी सपोनि. संतोष औटी, पीएसआय ऐडवळे, संतोष चव्हाण, चितारे, अक्षय पुरी, चालक विजय फोफसे, शिपाई प्रतीक्षा कानवडे यांनी सहभाग घेतला.

# मुंबई मराठी पत्रकार संघाच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचा विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या शनिवारी (दि.२९) झालेल्या चुरशीच्या लढतीमध्ये परिवर्तन पॅनलने विजय मिळवला. क्रीडा पत्रकार संदीप चव्हाण यांची मुंबई मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी मोठ्या मताधिक्याने निवड झाली. ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुकृत खांडेकर हे समर्थ पॅनलतर्फे अध्यक्षपदासाठी उभे होते. संदीप चव्हाण यांना ३१६ मते मिळाली तर खांडेकर यांना १६० मते मिळाली.

परिवर्तन पॅनलच्या स्वाती घोसाळकर यांना २८८ आणि मते आणि राजेंद्र हुंजे यांना २२५ मते मिळाली. हे दोन्ही




उमेदवार विजयी झाले तर उदय तानपाठक आणि विष्णू सोनवणे पराभूत झाले.

कार्यवाहपदी ज्येष्ठ पत्रकार शैलेंद्र शिर्के हे दिपक परब यांचा पराभव करून तर कोषाध्यक्षपदी जगदीश भोवड हे सारंग दर्शने यांचा पराव करून विजयी झाले.

**परिवर्तन पॅनलचे सर्व कार्यकारिणी सदस्य :** देवेंद्र भोगले, दिवाकर शेजवलकर, गजानन सावंत, आत्माराम नाटेकर, विनोद साळवी, किरीट गोरे, अंशुमान पोयरेकर, राजेश खाडे आणि राजीव कुलकर्णी विजयी झाले.

# पनवेल परिसरातील चोरीप्रकरणी त्रिकुटाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील चर्चमध्ये चोरी त्याचप्रमाणे खारघर येथील एका बंगल्यामध्ये केलेल्या ५२ लाखांच्या घरफोडीप्रकरणी त्रिकुटाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पनवेल शहरातील एका चर्चमध्ये त्रिकुटाने चोरी करून दानपेटीमधील रोख रक्कम चोरुन नेली होती. त्याचप्रमाणे खारघर येथील साईकुंज बंगल्यामध्येसुद्धा या त्रिकुटाने घरफोडी करून रोख रक्कम व दागिने असा मिळून जवळपास ५२ लाखांचा ऐवज चोरून नेला होता.

याबाबतच्या तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाणे व खारघर पोलीस ठाणे येथे करण्यात आल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट १चे पथक या आरोपींचा शोध घेत असताना आरोपी तळोजा भागात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

यानुसार पोलिसांनी अग्र धनबहाद्दुर बिस्ट उर्फ पवन (वय ३८), धनबीरे राहुले विसुक्रमा (वय ३१) व नवीन रतन विश्वकर्मा (वय ३६) या त्रिकुटाला ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे, तसेच त्यांच्याकडून अजूनही काही गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहे.

# माणगावात ॲड.राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त महावृक्षारोपण सप्ताह

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त महावृक्षारोपण सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवारी (दि.१)द.ग.तटकरे महाविद्यालय येथे करण्यात आला. या सप्ताहात विविध प्रकारची ५००० झाडे लावून त्या झाडांचे संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. संस्थेतर्फे माणगावातील प्रत्येक घरात एक रोप देण्यात येणार असून त्याची लागवड करून संगोपन करावे, असे आवाहन ॲड. राजीव साबळे यांनी केले.



ॲड. राजीव साबळे यांचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कला व क्रीडा क्षेत्रात मोठे योगदान आहे. त्यांचा ६०वा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी मंडळाकडून साजरा करण्यात येणार आहे. त्यापैकीच एक म्हणजे वृक्षारोपण कार्यक्रम होय.

या कार्यक्रमास संस्थेचे संचालक नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, विरेश येरुणकर, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, द.ग. तटकरे महाविद्यलायाचे प्राचार्य बबन खामकर, शिपूरकर इंग्रजी शाळेचे चेअरमन अरुण पवार, सुधाकर शिपूरकर व गणेश वाघरे इंग्रजी शाळा प्राचार्या मनीषा मोरे, गंगुबाई शिंदे सीबीएससी स्कुल माणगाव प्राचार्या निशिगंधा मयेकर उपस्थित होते.

# फौजदारी न्यायसंहिता कायद्यावरील विश्वास वाढवणारी -सोमनाथ घार्गे

**अलिबाग प्रतिनिधी**

देशात १ जुलैपासून नवी फौजदारी न्यायसंहिता प्रत्यक्ष राबवण्यास सुरुवात झाली असून ही संहिता सर्वसामान्यांचा कायद्यावर विश्वास वाढवणारी आहे, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

नव्या फौजदारी कायद्याची अंमलबजावणी व डॉक्टर्स डेनिमित्ताने रोटरी क्लब ऑफ अलिबाग सीशोअरच्या वतीने वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अधीक्षक घार्गे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

ही नवी प्रणाली सर्वसामान्य नागरिकांना न्याय व्यवस्थेवर विश्वास वाढवणारी आहे. पूर्वी कायद्यातील पळवाटा शोधून गुन्हेगार आपली सुटका करून घेत असे. आता तसे होणार नाही. कायद्याच्या अभ्यासकांनी ही संहिता तयार करताना पळवाटा बंद केल्या आहेत. भारतात अस्तित्वात असलेली दंड संहिता ही इंग्रजांनी तयार केलेली होती. तिच्यामध्ये संशोधन करून फौजदारी न्यायसंहिता करण्यात आली आहे. १ जुलैपासून ही प्रणाली वापरण्यास सुरुवात झाली असल्याचे घार्गे म्हणाले.

भारतीय दंड संहितेत ५११ कलमे आहेत, त्याऐवजी आता ३५८ कलमे असलेली भारतीय न्याय संहिता लागू होणार आहे. त्यात २० नव्या प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश आणि ३३ गुन्ह्यांच्या शिक्षेत बदल करण्यात आलेला आहे. महिला आणि बालके यांच्यासंबंधीचे गुन्हे असे नवे प्रकरण नव्या संहितेत समाविष्ट आहेच. शिवाय दहशतवाद, झुंडबळी, संघटित गुन्हेगारी, वंश, जात वा सामाजिक शत्रुत्वातून केले जाणारे गुन्हे यांचाही स्पष्ट उल्लेख नव्याने झालेला आहे. त्यामुळे त्याच्या अंमलबजावणीतही सुसुत्रता आल्याचे त्यांनी सांगितले.

वॉकेथॉनचे आयोजन अलिबाग सी शोअर रोटरी क्लबचे अध्यक्ष दिलीप भड, माजी अध्यक्ष डॉ. निलेश म्हात्रे, जनार्दन चापडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून करण्यात आले होते.




# रोहा पडम येथील जाखमाता देवी मंदिराचा जीर्णोद्धार

## माजी आमदार अनिकेत तटकरेंच्या हस्ते सभागृहाचे लोकार्पण

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील पडम गावचे ग्रामदैवत जाखमाता देवी मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला. यानिमित्त दोन दिवस गावात विविध कार्यक्रम झाले.

२९ व ३० जून या दोन दिवसांत पडम गावात उत्सव साजरा करण्यात आला. जाखमाता देवी प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण कार्यक्रम घेण्यात आले. देवीची नगर प्रदक्षिणा, पुण्यावाचन, सर्व प्रकारच्या मूर्तीला स्नान, धान्य अधिवास, जागर तर रविवारी गणेश पूजन, ९ ग्रह व देवतांची स्थापना, हवन, देवीची स्थापना, कलश हवन, ध्वजपूजन, महाआरती, महाप्रसाद, भजन व सायंकाळी ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी आमदार विकास कार्यक्रमांतर्गत विधान परिषद माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या विकासनिधीतून



सामाजिक सभागृह व जाखमाता देवीचे मंदिराचे सुशोभिकरणाचे लोकार्पण माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी, जाखमाता आईच्या आशीर्वादामुळे हे मंदिर पूर्णात्वास गेले आहे. तरुणांनी मंदिर पूर्ण करण्याची अपेक्षा माझ्याकडे व्यक्त केली होती. मंदिरासाठी आचारसंहिता संपल्यानंतर १५ लाखांचा निधी देणार असल्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, माजी सभापती राजश्री पोकळे, माजी जि.प.सदस्य नंदकुमार म्हात्रे, सरपंच अक्षरा डोलकर, माजी सरपंच राजेंद्र पोकळे, माजी सरपंच संदिप चोरगे, अनंत देशमुख, जयवंत मुंढे, मयुर खैरे, नवनीत डोलकर, धर्मा कोळी, चंद्रकांत ठमके, अनिल वाटवे, विभा चोरगे, नयनीता डोलकर, निवास खरीवले, गौरव सुर्वे, तानाजी देशमुख, नामदेव म्हात्रे आदी उपस्थित होते.

## राज्यात लवकरच पाच फिरत्या अन्न तपासणी प्रयोगशाळा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात सध्या एक फिरती अन्ननमुना तपासणी प्रयोगशाळा सुरू असून त्या धर्तीवर लवकरच पाच प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी सांगितले.

मालाड येथे ऑनलाईन मागवलेल्या आईस्क्रिममध्ये मानवी बोटाचा तुकडा सापडल्याची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर सदस्य विलास पोतनीस यांनी प्रश्न विचारला होता.

मंत्री आत्राम म्हणाले, जमा केलेल्या अन्न नमुन्यांची तपासणी करण्यासाठी मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे सध्या तीन प्रयोगशाळा आहेत. या प्रयोगशाळा वाढविण्याचा प्रयत्न आहे. जमा केलेल्या अन्न नमुन्यांची तपासणी तातडीने करण्यासाठी पीपीपी तत्वावर तपासणी प्रयोगशाळा सुरू करण्याचादेखील प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

# चिपळे परिसरातील विद्युत समस्या सुटणार

## भाजपचा पुढाकार; महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत सकारात्मक बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष जनतेच्या हितासाठी नेहमीच दक्ष असतो. पनवेलमधील चिपळे परिसरात विद्युत समस्या जाणवत आहेत. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्या पुढाकाराने महावितरणच्या



अधिकाऱ्यांसोबत रविवारी (दि. ३०) चिपळे येथे संयुक्त बैठक घेण्यात आली. या वेळी अधिकारीवर्गाने सकारात्मक प्रतिसाद दिला.

या बैठकीस महावितरणचे नेरे विभाग अभियंता रत्नाकर जाधव, कर्मचारी प्रदीप पाटील,



अनिकेत गीते यांच्यासह चिपळे येथील दी रिव्हेरा हौ. सो., विनायक कॉम्प्लेक्स, माऊंट करमल, रिव्हर व्ह्यू रो हाऊस, शिकारा एस्टेट फेस १ व २, साई पार्क, बालाजी आंगन, माउंट व्ह्यू सोसायटीचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी ग्रामस्थ तसेच विविध सोसायट्यांचे चेअरमन, सेक्रेटरी व सभासदांनी आपल्या समस्या मांडल्या. याबाबत युवा नेते विश्वजित पाटील यांनी महावितरणचे अभियंता रत्नाकर जाधव यांचे लक्ष वेधले. त्यावर जाधव यांनी लवकरात लवकर या संदर्भात योग्य ती कार्यवाही करू व नागरिकांच्या विद्युत समस्या दूर करू, अशी ग्वाही दिली.

## निवडक

### पळस्पे फाटा येथील तरुण हरवला

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुण कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. फहाद मस्तानअली शेख (१४ वर्षे १० महिने, रा.पळस्पे फाटा) असे त्याचे नाव असून रंगाने सावळा, उंची पाच फुट पाच इंच, अंगाने मध्यम बांधा, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे वाढलेले, कपाळाच्या वर डाव्या बाजूस जुन्या जखमेचे व्रण असून अंगात हिरवा टी-शर्ट व राखाडी रंगाची ट्रॅक पॅन्ट व पायात काळ्या रंगाची चप्पल आहे. त्याला हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा सहा.पो.निरीक्षक राजरत्न खैरणार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### चिखले येथून एक जण बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील चिखले गावातून ७० वर्षीय व्यक्ती



हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. हरिश्चंद्र चांगा पाटील असे हरवलेल्या व्यक्तीचे नाव असून ते चिखले येथून २७ जून २०२४पासून हरवले आहे. जर कोणास ते आढळले तर रोहीत हरिश्चंद्र पाटील (७०३९११८११०), रीना हरिश्चंद्र पाटील (८४४६३२१०८२) यांच्याशी संपर्क साधावा तसेच शोधून देणाऱ्यास पाच हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे, असे त्यांच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे.

### अल्पवयीन तरुणीला नेले पळवून



**पनवेल :** अल्पवयीन तरुणीला कुणीतरी अज्ञात व्यक्तीने तिला कशाची तरी भुरळ घालून कायदेशीर रखवालीतून पळवून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. वनिता कातकरी (१७ वर्षे १० महिने ९ दिवस) उंची चार फुट पाच इंच, बांधा मध्यम, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे मध्यम असून अंगात पांढरी थ्री फोल्ड पॅन्ट व काळा टी-शर्ट तसेच चॉकलेटी चप्पल घातलेली आहे. या तरुणीबाबत माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा सहा.पो.निरीक्षक राजरत्न खैरणार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वृद्ध महिलेच्या सोन्याच्या बांगड्यांची चोरी

**पनवेल :** एक ६७ वर्षीय वृद्ध महिला बसमध्ये चढत असताना तिच्याकडील दोन तोळ्यांच्या सोन्याच्या बांगड्यांची चोरी केल्याची घटना पनवेल एस.टी.स्टँण्ड बस डेपोमध्ये घडली आहे. रजनी पाटील या पनवेल एस.टी.डेपो येथे बसमध्ये चढत असताना एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्या हातातील दोन तोळ्याच्या सोन्याच्या बांगड्या ज्याची किंमत दिड लाख रुपये इतकी आहे. चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# बंदी काळात समुद्रात मासेमारी करणाऱ्या २१ बोटींवर कारवाई



**उरण : प्रतिनिधी**

खोल समुद्रातील मासेमारीसाठी बंदीचे आदेश असतानाही आदेशाचे उल्लंघन करून उरण-मुंबई-रायगड समुद्र परिसरातील ठिकठिकाणी अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या मागील ३० दिवसांत एकूण २१ मासेमारी बोटींवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती उरण सहाय्यक मत्स्यव्यवसाय परवाना अधिकारी प्रियांका भोई यांनी दिली आहे.

शासनाने १जुन ते ३१ जुलै २०२४ या दोन महिन्यांसाठी खोल समुद्रातील मासेमारी बंदीचे आदेश दिले आहेत.मात्र बंदीचे आदेश झुगारून शेकडो मच्छिमार बोटी मुंबई , रायगड परिसरातील समुद्रात अवैधरित्या मासेमारी करीत आहेत.

मासेमारीनंतर करंजा टर्मिनल्स, वशेणी पुल आणि खोपटा येथील खाडीत रिलायन्स जेट्टीवर अवैधरित्या अनेक मच्छिमार मासळीची विक्री करीत आहेत. चोरट्या मार्गाने आणलेल्या मासळीच्या खरेदीसाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथील व्यापारी,दलाल मोठ्या संख्येने येतात. मासळी खरेदी करतात. या अवैधरित्या सुरू असलेल्या गैरप्रकाराची बित्तंबातमी सहाय्यक मत्स्यव्यवसाय परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळताच मत्स्य व्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली उरण येथील मत्स्यव्यवसाय परवाना अधिकाऱ्यांनी मागील तीस दिवसांत २१ मच्छिमार बोटी पकडून कारवाई केली आहे.

कारवाई करण्यात आलेल्या बोटी ससुनडॉक बंदर विभागात नोंदणी केलेल्या असुन या बोटी करंजा, रावे-दादर,उसणोली परिसरातील मच्छिमारांच्या आहेत. कारवाई करण्यात आलेल्या बोटींवर गुन्हे दाखल करून कारवाईसाठी सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्तांकडे पाठविला जातो. अशा प्रकारे अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या मच्छिमार बोटींवर एक लाख २० हजार रुपयांपर्यंत दंडात्मक कारवाई केली जाते, अशी माहिती उरण सहाय्यक मत्स्यव्यवसाय परवाना अधिकारी प्रियांका भोई यांनी दिली आहे.





**उलवे नोड : आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सेक्टर ८, ९,१० येथील समस्यांचा रविवारी पाहणी दौरा केला व तेथील नागरिकांशी संवाद साधला. या समस्या तत्काळ आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वात सोडवू आणि भाजप उलवे नोड कमिटी नेहमीच तुमच्या बाजूने असेल, असे त्यांनी या वेळी सांगितले. यानंतर सोमवारी लगेचच सिडकोकडे पाठपुरावा करून कामांना सुरुवात करण्यात आली.**





**कळंबोली : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक अमर पाटील यांनी महापालिका प्रभाग क्रमांक ७मधील सेक्टर १० येथील सूर्योदय सोसायटी, विजय मिलन सोसायटी, तरंग सोसायटी येथे हायमास्ट दिवे बसवून दिले आहेत. या दिव्यांचे लोकार्पण अमर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**



**पनवेल : चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : भाजपचे आदई येथील युवा कार्यकर्ते कैलास पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी राम शेळके, पदमाकर शेळके उपस्थित होते.**



**पनवेल : माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या मुख्यालयात सोमवारी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, लेखाधिकारी मंगेश गावडे, संग्राम ऱ्होरकाटे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियान सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात १ जुलै ते ३१ ऑगस्टदरम्यान स्वच्छ भारत मिशन शहरी २.० अंतर्गत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियान राबविण्यात येणार असून या अभियानाचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते सोमवारी (दि.१) आद्य क्रांतीवीर वासुदवे बळवंत फडके नाट्यगृहात उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी स्वच्छतेची शपथ सर्वांनी घेतली.

या वेळी प्रमुख पाहूणे डॉ. सुप्रिया सहस्त्रबुध्दे, एमजीएमच्या डॉ.आश्लेषा तावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, मुख्य वैद्यकिय आरोग्य विभाग प्रमुख डॉ.आनंद गोसावी, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, घनकचरा व आरोग्य विभागाचे विभागप्रमुख अनिल कोकरे, पशुधन अधिकारी डॉ. भगवान गीते, डॉ. मनिषा चांडक, डॉ.आकाश ठसाळ, महापालिकेचे सर्व वैद्यकिय अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, अरूण कांबळे, सर्व आरोग्य निरीक्षक, एनएम,जीएनएम आशा सेविका महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## डॉक्टर्स डेनिमित्त वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सत्कार

**१ जुलै हा 'आंतरराष्ट्रीय डॉक्टर्स डे' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने महापालिका कार्यक्षेत्रात १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, दोन आपला दवाखना व सहा आरोग्य वर्धिनी केंद्रांच्या सर्व वैद्यकिय अधिकाऱ्यांचा आयुक्तमंगेश चितळे व उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.**

या वेळी आयुक्त मंगेश चितळे म्हणाले, स्वच्छता व आरोग्य यांचे केंद्र शासनाने एकत्रिकरण करण्याचे ठरविले आहे. सफाई कर्मचारी, बहुद्देशिय कर्मचारी, आशा वर्कर्सच्या या आपल्या यंत्रणे मार्फत आपण शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचलो तर आपण सर्व घरांपर्यत पोहचणार आहे.यामुळे महापालिका क्षेत्रात रोगराई टाळणे शक्य होणार आहे. हा आरोग्यदायी कार्यक्रम आपण जास्तीत जास्त यशस्वी करूया असे आवाहन आयुक्तांनी केले.

या वेळी डॉ. सुप्रिया सहस्त्रबुध्दे यांनी 'अतिसार व आरोग्य शिक्षण' याविषयावरती मार्गदर्शन करताना म्हणाल्या कोरोना गेल्यानंतर आपण हात धुण्याचे महत्व् आपण विसरलो आहे. स्वच्छतेवरती आपण सर्वांनी भर दिला पाहिजे. आशा सेविकांनी नागरिकांना सहा सहा महिन्याला हात धुण्याचे प्रशिक्षण देऊन जनजागृती केली पाहिजे. अतिसारामध्ये पाणी महत्वाचे असून लिंबूपाणी, नारळ पाणी, ताक, ओआरएस असे पदार्थ घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.आश्लेषा तावडे यांनी अतिसारामध्ये झिंक आणि ओआरएस उपयुक्त असून नागरिकांना याचे महत्व पटवून सांगितले पाहिजे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ पाणी पिणे महत्वाचे आहे. यासाठी पाणी २०-२५ मिनिटे उकळून पिणे, पाणी स्वच्छ करण्यासाठी क्लोरीनच्या गोळ्या, मेडिक्लोर थेंब पाण्यात मिसळावे तसेच शारिरीक स्वच्छता, हात धुण्याची पध्दत याबद्दलची माहिती त्यांनी सांगितली.

उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये म्हणाले, आपले शहर स्वच्छ, आरोग्यदायी राहण्यासाठी आयुक्त नेहमीच सूचना देत असतात. या अभियानाचे वेगळेपण म्हणजे केवळ घनकचरा आणि आरोग्य विभागापुरते हे अभियान मर्यादित नसून, यामध्ये शिक्षण विभाग, वैद्यकीय आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग अशा सर्व विभागांचा सहभाग महत्वाचा आहे. सर्वांनी एकत्रित येऊन हे अभियान यशस्वी करूया, असे उपायुक्तांनी सांगितले.

मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी म्हणाले या कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त नागरिकांना सामावून घेणे गरजेचे आहे. आशा सेविकांनी घरोघरी जाऊन या अभियानाची माहिती द्यावी. तसेच शाळाशाळांमध्ये जाऊन हात धुण्याचे प्रशिक्षण देण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित वैद्यकियांना दिल्या.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा भारतीय मानक ब्युरोच्या प्रशिक्षणामध्ये सहभाग



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय मानक ब्युरोच्या मुंबई कार्यालयाने २७ व २८ जून रोजी आयोजित केलेल्या दोन दिवसीय रहिवाशी प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून विज्ञान शाखेतील प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा. रिजवाना मोमीन व प्रा. राजश्री म्हात्रे यांनी सहभाग घेऊन प्रशिक्षण घेतले.

या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मेंटॉर ऑफ स्टँडर्ड क्लब स्थापन करून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, इंडियन ब्युरो ऑफ स्टँडर्डची भूमिकेविषयी माहिती घेणे तसेच विद्यार्थ्यांच्या ग्राहक म्हणून जबाबदाऱ्या व त्यांचे अधिकार, वस्तू व सेवा घेताना त्यांच्या असणाऱ्या आवडीनिवडी याविषयी जागृकता निर्माण करण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी प्रशिक्षण घेतल्याबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# दुर्दैवी अपघात

लोणावळ्याजवळच्या भुशी धरणापाशी वर्षाविहारासाठी गेलेल्या कुटुंबातील पाच जण पाण्याच्या लोंढ्यात वाहून गेले, त्यामुळे सारेच हळहळत आहेत. हा अपघात निश्चितच टाळता आला असता, परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही, घडताना दिसत नाही.

**पावसाळ्याच्या दिवसांत महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्यांमध्ये निसर्गशोभा अवर्णनीय असते हे खरेच. जागोजाग हिरवाईने विनटलेले डोंगरमाथे, रौद्र स्वरूप दाखवणारे धबधबे, भरून वाहणारे तलाव अशा ठिकाणी पर्यटकांची झुंबड उडते. एका दिवसाची वर्षासहल हा पुण्या-मुंबईकरांच्या दृष्टीने सोयीचा बेत असतो. माथेरान किंवा लोणावळ्यासारख्या ठिकाणी जाणे-येणे सहज शक्य होते. शिवाय अशा सहलीच्या बेतांमध्ये धाडस कमी आणि गंमत जास्त अशीच साऱ्यांची समजूत असते. भुशी डॅम हा तर सामान्य पर्यटकांसाठी फारच सोयीचा पिकनिक स्पॉट झाला आहे. पुण्या-मुंबईकडील शेकडो कुटुंबे आठवडाअखेरचा मुहूर्त साधून भुशी डॅममध्ये भिजण्यासाठी येतात. दिवसभर मौजमजा करून आपापल्या घरी जातात. यात नवीन असे काही नाही. किंबहुना गेली अनेक वर्षे हा परिपाठ चालू आहे. भुशीसमवेत तुंगार्ली डॅम, घुबड तलाव, राजमाची हीदेखील लोकप्रिय स्थाने आहेत. या ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने सोयीसुविधाही बऱ्यापैकी विकसित झाल्या असल्याने पर्यटकांचे लोंढे निर्धास्तपणे येत असतात. तथापि, रविवारी घडलेल्या घटनेने मात्र सारा महाराष्ट्र हादरून गेला. हडपसर येथील अन्सारी कुटुंबातील दहा-पंधरा पाहुणे भुशी डॅमच्या वर्षासहलीसाठी लोणावळ्यात आले होते. दुपारी एकच्या सुमाराला धरणाच्या खळखळत्या प्रवाहात दगडांवर बसलेले असताना अचानक पाण्याचा प्रवाह वाढून एका महिलेसह चार मुले वाहून गेली. दहा जणांपैकी पाच जण कसेबसे वाचले, परंतु पाच जणांना प्राणांस मुकावे लागले. त्यापैकी दोन लहान मुलांचे मृतदेह सोमवारी सापडले तर बाकीचे तीन मृतदेह रविवारीच हाती लागले होते. पुण्यातील हे कुटुंब घरातील एका लग्नसोहळ्यासाठी आग्र्याहून आलेल्या पाहुण्यांच्या आग्रहामुळे लोणावळ्याला पावसाची मजा लुटण्यासाठी गेले होते असे समजते. निसर्गाचा आनंद लुटावा यात गैर काहीच नाही, परंतु तसे करताना काळजी घेण्याची नितांत गरज असते. निसर्गाचा आदर राखूनच ही मौजमजा करायला हवी. लोणावळ्यात ही दुर्घटना घडत असतानाच ताम्हिणी घाटातील प्लस व्हॅली येथील धबधब्यात भोसरीच्या एका स्वप्निल धावडे नामक तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. जिम्नॅशियममध्ये प्रशिक्षक असलेल्या या धाडसी तरुणाने धबधब्यात उडी घेतल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. बॉक्सिंगमध्ये राष्ट्रीय पातळीवर खेळलेला हा युवक अचानक मृत्यू पावल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होताना दिसत आहे. निसर्गाच्या कुशीत हिंडताना नेहमी सावध असायला हवे. अनोळखी ठिकाणी तर धाडस करायला मुळीच जाऊ नये, एवढे भान अनेक पर्यटकांना नसते. मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी सोमवारी विधिमंडळात लोणावळ्याच्या दुर्घटनेची सविस्तर माहिती दिली. भुशी डॅमसारख्या ठिकाणी आजही काही निर्बंध आहेत, परंतु अतिउत्साहाच्या भरात अनेक पर्यटक हे निर्बंध झुगारुन देतात आणि प्राण गमावून बसतात. भुशी डॅम हे तितकेसे धोकादायक ठिकाण नाही, परंतु पावसाळ्यात पाण्याची पातळी कधी वाढेल याचा काही नेम नसतो. अशा काळात तरी सरसकट कडक प्रतिबंध लावावेत असे वाटते. पर्यटकांनी सुरक्षित ठिकाणीच सहलींना जावे आणि निसर्गाचा आनंद लुटावा, यातच खरे शहाणपण आहे. लोकांमध्ये जागरुकता येत नाही, तोवर असे दुर्दैवी प्रसंग ओढवतच राहणार असे दिसते.**

# महाड शहरातील गटारांची सफाई ‘पाण्यात’



महाड शहरातील गटार आणि नाले स्वच्छता पावसाळ्याच्या तोंडावर केल्याचे भासवले. शहरातील अनेक रस्त्यांच्या कडेला असलेल्या गटारातील पाणी थेट रस्त्यावर येवून तुंबत आहे. यामुळे गटार आणि नाले सफाई फक्त कागदावरच केली का, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

ऐन पावसाळ्यापूर्वी शहरातील गटारे आणि आले सफाई होणे आवश्यक असते. महाड नगर परिषदेत या कामासाठी ठेका देण्यात आला. शहरातील नाले आणि गटारे पावसाळ्याच्या तोंडावर सफाई करण्याची काम होते घेण्यात आले होते. काही ठिकाणी गटारी आणि स्वच्छता केल्याचे भासवले मात्र अनेक ठिकाणी आजही गटारे कचरा आणि मातेने भरलेली आहेत यामुळे नाल्यातील आणि गटातील पाणी थेट रस्त्यावर येऊन थांबत आहे. रस्त्यावर दमलेल्या पाण्यामुळे नागरिकांना तसेच दुचाकीस्वारांना त्रास होत आहे. रस्त्यावरील पाणी गटारामध्ये जाण्याकरता जेसीबी यंत्राद्वारे मार्ग काढून दिला असला तरी गटारातील पाणी मोठ्या नाल्यांना मिळत नसल्याने हे पाणी पुन्हा रस्त्यावर येऊन थांबत आहे. महाड नगरपालिकेकडून करण्यात आलेली ही गटार आणि नाले सफाई कागदावरच केली गेली का असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

महाड या ऐतिहासिक शहरांमध्ये अनेक वर्षांपूर्वी काही भागांमध्ये भूमिगत नाल्यांची व्यवस्था होती. यामुळे पाण्याचा निचरा व्यवस्थित होऊन थेट नदीला पाणी मिळत होते, मात्र बदलत्या काळामध्ये फक्त ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमतातून पैसा खर्च करण्याच्या प्रयत्नात केली जाणारी गटारे ही तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याने गटारातील पाण्याचा निचरा होत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे अभियांत्रिकी विभागाचा कारभार ऐन पावसाळ्यात कायम चव्हाट्यावर येतो. या पावसाळ्यातदेखील अशीच अवस्था महाड शहरात विविध रस्त्यांवर झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक ते काकरतळे गणेश मंदिर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी तुंबत आहे. या रस्त्यावर बँक ऑफ इंडियाची शाखा असल्याने वयोवृद्ध नागरिकांना याच पाण्यातून मार्ग काढत जावे लागत आहे. अशीच अवस्था चवदार तळ्याच्या चहुबाजूने झाली आहे. चवदार तळ्याच्या मुख्य द्वाराच्या उजव्या बाजूला गटार सफाई झालेली नसल्याने आणि येथील पाणी दुसऱ्या मोठ्या गटाराला मिळत नसल्याने रस्त्यावरच पाणी तुंबले आहे. शहरातील अनेक अंतर्गत रस्त्यांवरदेखील अशीच अवस्था पहावयास मिळत आहे. गेली दोन ते तीन वर्षांपासून दादली पुलाजवळ रस्त्यावरच पाणी तुंबले जात असल्याने या ठिकाणी पडलेल्या खड्ड्यामुळे वाहनांचे नुकसान होत आहे.

गटार आणि नालेसफाईवर महाड नगरपालिकेकडून कायम खर्च केला जात आहे मात्र हा खर्च पूर्णतः वाया जात असल्याचे दिसून येत आहे. संबंधित ठेकेदार पावसाळ्यापूर्वी केली जाणारी कामे ही पावसाळ्याच्या तोंडावर करत असल्याने अशी अवस्था निर्माण होत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. या तुंबलेल्या गटारामुळे ऐन पूर परिस्थितीत शहरात आलेले पुराचे पाणी निचरा होण्यास वेळ लागत आहे. यामुळे नागरिकांना किमान दोन दिवस तरी पुराच्या पाण्याचा त्रास सहन करावा लागतो. महाड नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने याबाबत त्वरित लक्ष घालून साचलेल्या पाण्यासाठी मार्ग काढून दिला पाहिजे, अशी मागणी करण्यात आली आहे.

**खबरबात**
**महेश शिंदे**

# वर्षासहलीसाठी मुरूडमधील फणसाड डॅमला पसंती



पावसाळा सुरू झाला की तरूणाईला वेध लागतात ते वर्षासहलीचे, डोंगर कपाऱ्यातील वाहणाऱ्या धबधब्याखालील धरणातील धावणारे पाणी अंगावर घेण्यासाठी आतुरलेली युवा मंडळी वर्षासहलीचे प्लनिंग करतात, मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यातील फणसाड डॅमला तरूणाईच्या उत्साहाचा बहर वर्षा सहलीच्या निमित्ताने पहावयास मिळतो.

मुरूड तालुक्यातील बोर्ली मेथून अंदाजे सहा ते सात किमी अंतरावरील वळणा वळणाच्या रस्ताने जाऊन भोईघर गावावरून पुढे काजुवाडी, बेलवाडी गावाच्या पुढे डोंगरात फणसाड अरण्यातील फणसाड डॅमवर जाता येते. पावसाळी पाण्माने तुंडूब भरलेले धरण तसेच आजुबाजूच्या डोंगर कपारीतील मनमोहक दृष्म, धरणावरून काजुवाडी तसेच बेलवाडी गावासह धरणामुळे परिसरातील हिरवीगार शेतीतील नांगरीचे दृश्य डोळ्यांला विलोभनिय निसर्गसौंदर्यांनी भुरळ पाडते.

फणसाड धरणातून बोर्ली पंचक्रोशीतील बावीस गावांना पाणी पुरवठा करते. फक्त पावसाळी फणसाड डॅमला वर्षा सहलीच्या निमित्ताने मोठी गर्दी होते. फणसाड धरणानेच मेथील शेतीचे सोने झाले असून पावसाळा व्यक्तीरिक्त उन्हाळी शेती डोंगर कपारीत वसलेल्या भोईघर, काजुवाडी, व बेलवाडी परिसरातील गावातून घेतली जाते. शिवाम धरणाचे पाण्याने येथील परिसरात सुपारीच्या बागा शिवाय भाजीपालासुध्दा घेतला जातो.

बेलवाडी व काजूवाडी मेथून फणसाड धरणाच्या डॅमकडे डोंगरातून कच्चा रस्ताने जावे लागते, डोंगरात असल्माने पक्का रस्ता पावसाच्या पाण्याने नित्याने वाहून जातो. फणसाड धरण तुडूंब पाण्याने भरल्यानंतर वाहून जाणाऱ्या पाण्यात वर्षा सहली मंडळीची मौजमज्ञा असते, परंतू जेव्हा पाऊस नसतो तसेच पाणी वाहून जात नाही त्यावेळी वर्षा सहलीतील युवा मंडळी धरणाच्या पाण्यात पोहण्याचा आनंद घेत असतात, परंतू धरणाच्या पाण्यात नदीचा प्रवाह जेथून असतो तेथे पाण्माचा खोलगट भाग असतो, या खोलगट भागात गेल्याने या फणसाड धरणात दोघांचा बुडून अपधाती मृत्यू झाला आहे. परंतू येथे पाण्यात पोहणाऱ्यांसाठी धोक्याची कोणतीही निशाणी नाही, शिवाम कोणताही सुचना बोर्ड लावले गेले नाही.

फणसाड डॅमला वर्षा सहलीच्या निमित्ताने तरूणाईची मोठी पसंती आहे. पावसाळयात दर शनिवार तसेच रविवारी मोठी गर्दी पहावमास मिळते. डोंगर कपारीत वसलेल्मा निसर्ग सौंदर्याची मुक्त हस्ते उधळण असलेल्मा परिसर युवा वर्गाला भावतो, मनमोकळेपणानी एक वेगळा आनंद मिळविता मेतो. धरणातून वाहून जाणाऱ्या पाण्यात ओलेचिंब भिजत बसण्माची मज्ञा काही औरच असते. नेहमीच दगदगीच्या जीवनातून वनडे पिकनिक म्हणून फणसाड डॅमचे महत्त्व पावसाळ्यांत दिवसेंदिवस वाढत आहे. पुढे सुविधाची उपलब्धता होईलच, परंतू तरूणाईच्या उत्साहाला सुरक्षितेचे कवच फारच जरूरीचे आहे. नाहीतर फणसाड डॅमच्या वर्षा सहलींना गालबोट लागू शकेल, मात्र फणसाड डॅमचे वर्षा सहलीचे महत्त्व वाढावे हीच नित्याची सर्वांची सदिच्छा असेल.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**



## बदलते तंत्रज्ञान

### ॲपल एअरपोड्‌समध्ये ऑडिओ, व्हिडीओ पाहण्याचा अनुभव

सध्या वायरलेस एअरपॉड्सची मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे प्रत्येक कंपनी त्यांच्या जास्त काळ टिकणाऱ्या बॅटरी लाइफसह ग्राहकांसाठी एअरपॉड्स घेऊन येत असतात. अशातच या सगळ्या कंपन्यांमध्ये पल एअरपॉड्स खूप जास्त महाग असतात, पण ग्राहकांना उत्तम ऑडिओचा लाभ घेता यावा यासाठी यात अनेक फीचर्सदेखील असतात. तर आता कंपनी ग्राहकांसाठी काहीतरी खास घेऊन येत आहे. आगामी एअरपॉड्समध्ये वापरकर्त्यांना कॅमेरा देण्यात येणार आहे. ज्याचे डिव्हाइसला स्पर्श न करताही नियंत्रण करता येणे शक्य होणार आहे.




दी इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार ॲपल एअरपॉड्स बऱ्याच नवीन फीचर्समुळे ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहेत. उद्योग विश्लेषक मिंग-ची कुओ सुचवितात की, पुढील पिढीचे म्हणजेच २०२६ मध्ये लाँच होणाऱ्या एअरपॉड्समध्ये कॅमेरा असणार आहे. त्यामुळे वापरकर्त्यांना व्हिजन प्रो व संगणकासह डिझाइन बदल एकत्रितपणे करणे शक्य होईल. आगामी एअरपॉड्स वेगळे दिसतील की स्वाक्षरीचे एअरपॉड्स डिझाइन पुढे चालू ठेवतील हे सध्या अस्पष्ट आहे. त्याआधी फेब्रुवारीमध्ये ब्ल्यूमबर्गनेदेखील अशाच एका विकासाची नोंद केली होती.

तर २०२६ मध्ये लाँच होणाऱ्या एअरपॉड्समध्ये फेसआयडी रिसिव्हर सेटअपप्रमाणे कॅमेरा हार्डवेअर असेल. त्यामध्ये इन्फ्रारेड सेन्सर आहे; जो ऑडिओ अनुभव देऊन व्हिडीओ पाहणाऱ्या ग्राहकांचा अनुभव आणखीन खास करील. आगामी एअरपॉड्स कशा प्रकारे डिझाइन करण्यात येतील याची अद्याप कोणतीही माहिती समोर आली आहे. त्याशिवाय कॅमेरा हार्डवेअर पर्यावरणीय बदल शोधण्यात कॅपेबल असेल आणि युजर्स एअर जेश्चरचा वापर करून, एअरपॉड्सला स्पर्श न करताही नियंत्रण करू शकतील. तसेच दरवर्षी कंपनीने १० दशलक्ष एअरपॉड्साठी १८ ते २० दशलक्ष सेन्सर तयार केल्याची नोंद झाली आहे.

ॲपल एअरपॉड्स हे आयफोन ७ सीरिजबरोबर सादर केलेले, जगभरातील सर्वांत लोकप्रिय वायरलेस इअरफोन आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये, पलने एअरपॉड्समध्ये अनेक नवीन फीचर्ससह सुधारणा केल्या गेल्या आहेत आणि नुकत्याच झालेल्या २०२४ वर्ल्डवाइड डेव्हलपर्स कॉन्फरन्स (WWDC) मध्ये नवीन कॅमेरा हार्डवेअरसह, ॲपल त्यांना व्हिजन प्रोशी सुसंगत काहीतरी नवीन घेऊन येण्याचा मार्ग कंपनी शोधत आहे.

# स्वातंत्र्यसैनिक युसूफ मेहेर अली



## निमित्त

युसूफ मेहर अली यांचे मूळ नाव युसूफ झफर मर्चंट हे भारतीय स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचे कुटुंब मूळ गुजरातच्या कच्छ भागातील होते. मेहरअली यांच्या आजोबांचा मुंबईमध्ये कापडाचा व्यवसाय होता. मेहरअली फार कमी वयात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले. तरुण वयात ते ब्रिटिश सरकारच्या गुलामगिरी विरोधात रस्त्यावर उतरले. कॉलेजमध्ये असताना ते बॉम्बे प्रेसीडेंसी युथ लिग संघटनेत सामील झाले. ते सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक सदस्यापैकी एक होते. त्यांनी १९४२च्या चले जाव आंदोलनात महत्त्वाची भूमिका राबवली होती. ’चले जाव’ ही घोषणादेखील त्यांनीच दिली होती. आज युसूफ मेहर अली यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

यूसुफ मेहर अली, भारतातील युवक चळवळीचे नेते, उत्तम वक्ते व स्वातंत्र्य चळवळीतील एक क्रांतिकारक. त्यांचे खोजा मुस्लिम कुटुंब मूळचे गुजरातच्या कच्छ संस्थानातील. त्यांचे वडील व्यापारानिमित्त मुंबई व कलकत्ता या शहरांत राहत. यूसुफ यांचा जन्म मुंबईत झाला पण त्यांचे प्राथमिक शिक्षण कलकत्यात झाले. नंतर त्यांनी सर्व शिक्षण मुंबईतच घेतले. विद्यार्थि दशेतच रस्पूट्यीन क्लब नावाची युवक संघटना मिनू मसानी, उपेंद्र देसाई, के एफ. नरिमन आदी मित्रांच्या साह्याने त्यांनी स्थापन केली. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून (मुंबई विद्यापीठ) त्यांनी पदवी घेतली (१९२५). त्यानंतर ते एल्एल. बी झाले पण त्यांच्या युवक चळवळीमुळे त्यांना वकिलीची सनद नाकारण्यात आली. तेव्हा त्यांनी आ. रा. भटांच्या मदतीने बॉम्बे यूथलीगची स्थापना केली (१९२८). पुढे तिचेच रूपांतर बॉम्बे प्रसिडेन्सी यूथ लीगमध्ये झाले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर यूथ लीगची श्रद्धा होती. लीगच्या निवडक चारशे स्वयंसेवकांनी मेहरअलींच्या नेतृत्वाखाली मुंबई बंदरात सायमन कमिशनविरुद्ध निदर्शने केली. त्यात मेहरअलींना मार बसला. १९२९ मध्ये त्यांनी लष्कराच्या धर्तीवर नॅशनल मिलिशा नावाची सैनिकीसम संघटना स्थापन केली. या संघटनेचे ध्येय लोकांना शिक्षित करून स्वातंत्र्याची जाणीव करून द्यावयाची आणि नंतर त्यांना कृतीसाठी उद्युक्त करावयाचे, हे होते. या सामाजिक प्रबोधनासाठी त्यांनी चर्चासत्रे, बौद्धिके आयोजित केली आणि व्याख्याने दिली.

मुंबईच्या कामगारांना संघटित करून त्यांनी कामगार चळवळीचा पाया घातला. मुंबईतील असंघटित व विखुरलेल्या गुमास्त्यांना त्यांनी एकत्र आणले आणि त्यांचे कामाचे तास, सुटी आणि वेतन हे प्रश्न धसास लावले. यामुळे ब्रिटिश सरकारला गुमास्ता कायदा करणे भाग पडले. १९४२ मध्ये त्यांनी छोडो भारत आंदोलनात भाग घेतला. भूमिगत राहून त्यांना जनजागृती करावयाची होती पण ते सापडले व त्यांना शिक्षा झाली. तुरुंगातील वातावरणात त्यांची प्रकृती अधिक क्षीण झाली. पुढे उपचारार्थ ते अमेरिकेला गेले (१९४७) पण फारसा उपयोग झाला नाही. अखेर ऐन उमेदीतच ते मुंबई येथे मरण पावले. २ जुलै, १९५० रोजी वयाच्या ४७ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. पनवेल येथील तारा येथे त्यांच्या नावे युसूफ मेहेर अली सेंटर चालवले जाते.

मुंबईच्या कामगार चळवळीतील व भारतीय युवक संघटनेतील त्यांचा वाटा संस्मरणीय आहे. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : सतत पडणाऱ्या पावसामुळे जलाशये छान भरली आहेत. हे छायाचित्र आहे आदई येथील तलावाचे.** (छाया : निलोफर खान)

## आरोग्य प्रहर

### सतत ब्लॅक टी, लेमन टी पिण्याचे ‘हे’ साईड इफेक्ट्स

जगभरात कोट्यावधी चहाप्रेमी आहेत. भारतातही बहुतांश लोकांना दिवसभरात २-३ कप चहा पिण्याची आवड आणि सवयही असते. एखादी हेल्दी व्यक्ती १-२ कप चहा प्यायल्यास काहीच नुकसान नाही, मात्र कोणी त्यापेक्षा जास्त चहा प्यायल्यास त्यामुळे त्रास होऊ शकतो.



मुंबईत एका ४२ वर्षीय व्यक्तीला जास्त चहा पिण्याची सवय नडली, त्यामुळे त्याच्या किडनीवर परिणाम झाला व रुग्णालयात दाखल करावे लागले. खरंतर तो माणूस रोज ग्रीन किंवा लेमन टी पीत होता व त्यामध्ये व्हिटॅमिन सी घालत असे. कोरोना नंतर, व्हिटॅमिन सी चा ट्रेंड इतका वाढला की काही लोकांनी ते त्यांच्या दैनंदिन आयुष्यात समाविष्ट केले आहे. पण चहासोबत व्हिटॅमिन सी घेतल्याने किडनी आणि यकृतावर वाईट परिणाम होतो आणि इतर अनेक आजारांचा धोकादेखील वाढू शकतो.

**किडनी स्टोनचा धोका**

डॉक्टरांच्या सांगणायानुसार, कोविडच्या काळात रोज ब्लॅक टी व त्यासह व्हिटॅमिन सी सेवन करण्याचा ट्रेंड वाढला होता. पण प्रत्येक व्यक्तीला त्याची गरज नसते. ज्या व्यक्तींना आरोग्याच्या इतर समस्या आहेत, त्यांनी जास्त चहा आणि व्हिटॅमिन सी चे सेवन करणे अत्यंत घातक ठरते. चहाचे जास्त सेवन केल्याने शरीरावरही विपरीत परिणाम होतो.

डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, अनेक कप ब्लॅक टी पिणे ही सवय अतिशय धोकादायक ठरू शकते. व्हिटॅमिन सी हे शरीरासाठी अतिशय आवश्यक असते. शरीराचा विकास आणि लोह शोषले जावे यासाठी व्हिटॅमिन सी ची गरज असते. आपल्याला दररोज ७५ ते ९० मिलीग्राम व्हिटॅमिन सी आवश्यक आहे. हे मुख्यतः अन्नातून मिळते. जर कमतरता असेल तर डॉक्टर १००० मिलीग्रामपर्यंत व्हिटॅमिन सी सप्लिमेंट घेण्याची शिफारस करतात.

**जास्त चहा आणि व्हिटॅमिनमुळे अनेक आजार**

जास्त प्रमाणात व्हिटॅमिन सी घेतले तर ते शरीरात तुटते आणि ऑक्सलेटमध्ये बदलते. ज्यामुळे शरीरात कॅल्शियमचे प्रमाण वाढते आणि ते किडनी स्टोनच्या स्वरूपात दिसून येते. एवढेच नाही तर व्हिटॅमिन सीचे जास्त प्रमाणात सेवन केल्यास यकृत, संधिवात तसेच किडनीचे आजार होऊ शकतात. जास्त प्रमाणात व्हिटॅमिन सी घेतल्यास किडनीच्या कार्यावर परिणाम होतो आणि काही प्रसंगी किडनी निकामीदेखील होऊ शकते.

# माटवण आदिवासीवाडीवर दरडीची टांगती तलवार

## स्थलांतराबाबत संभ्रम; प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील माटवण आदिवासीवाडीवर गेल्या वर्षीपासून दरडीची टांगती तलवार कायम आहे. येथील ग्रामस्थांचे स्थलांतरीत होण्याबाबत प्रशासनाकडून अजूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

तालुक्यातील माटवण महसुली गावातील आदिवासीवाडीमध्ये लगतच्या डोंगरामधून काही ठिकाणी दरड कोसळण्यास सुरुवात झाली आहे. या डोंगराच्या विरूद्ध दिशेला एक डबर दगडखाण असून तिथे मागणीनुसार गौणखनिज उत्पादन करण्यासाठी वेळप्रसंगी सुरूंग स्फोटदेखील केले जातात. त्यामुळे या डोंगरातून लालमातीसोबत दगड घरंगळत लोकवस्तीपर्यंत गेल्या वर्षी आले होते. यानंतर ४ सप्टेंबर २०२३ रोजीच्या ग्रामसभेमध्ये या आदिवासीवाडीचे कायमस्वरूपी स्थलांतरण होण्यासाठी ग्रामपंचायत माटवणकडून ठराव करण्यात आला. सर्व्हे नंबर १२४ या गुरचरण जमिनीचा कायमस्वरूपी स्थलांतरणासाठी उपयोग करण्यास ग्रामपंचायतीची कोणतीही हरकत नसल्याचेही या ठरावात नमूद करण्यात आले. माटवण आदिवासीवाडीतील ग्रामस्थांनीदेखील सरपंचांकडे कायमस्वरूपी स्थलांतरण होण्यासाठी निवेदन दिले असून या निवेदनावर २१ कुटूंबांचे अंगठे व स्वाक्षऱ्या आहेत.

तहसील कार्यालयाला पाठविण्यात आलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने मंडल अधिकारी राठोड यांनी दरडग्रस्त लोकवस्तीची प्रत्यक्ष पाहणी करून गुरचरण जागेचा अहवाल आदिवाडीवाडी ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यासाठी भेटही दिली. या वेळी निवेदनावर स्वाक्षरी व अंगठयाचा ठसा उमटविणारे रोहित वाघे, आकाश मुकणे, बाळा वाघे, वसंत मुकणे, सुरेश मुकणे, भरत पवार, संतोष मुकणे, अना वाघे, दशरथ वाघे, कळी वाघे, नंदा जाधव, इटा मुकणे, निर्मला मुकणे, काया वाघे, सरू वाघे, रंजना पवार, वसंत मुकणे, गौरी मुकणे, कोमल मुकणे, बारकू मुकणे, सिताराम मुकणे व रूमा मुकणे यांनी मंडल अधिकारी राठोड यांच्या भेटीवेळी विस्थापित होण्याची मानसिकता स्पष्ट केली. गुरचरण जमिनीवर सुमारे ४० आदिवासी कुटूंबांचे कायमस्वरूपी स्थलांतरण करण्यासाठी अनुकूलता असल्याने शासनाने याकामी तातडीने सहकार्य करण्याचे आवाहन निवेदनाद्वारे आदिवासी ग्रामस्थांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून या डोंगरातून मातीचा ढिगारा भूस्खलन होऊन कोसळला असून काही दगडांनी आदिवासीवाडीतील घरांच्या दिशेने वाटचाल केल्याने या वस्तीवरील भूस्खलनाचा धोका दिसून आला आहे, मात्र स्थलांतराबाबत ग्रामस्थांना अद्यापही कोणतीही सूचना देण्यात आली नसल्याने नाराजी व्यक्त केली आहे.

# माणगाव आश्रमशाळेतील मुलीचा आजारपणामुळे मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव आश्रमशाळेतील सहा वर्षीय मुलीचा आजरपणामुळे मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आश्रमशाळेतील नेत्रा भरत लेंडी (रा. बोरावाडी, पो. बेणसे, पेण) ही दोन दिवसांपासून आजारी होती. तिला ताप व उलटीचा त्रास होत असल्याने उपजिल्हा रुग्णालयात तिच्यावर औषधोपचार चालू होते. ते चालू असतानाच तिचा मृत्यू झाला.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाणे येथे करण्यात आली असून पुढील तपास पो. नि. एन. बी. बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली म. पो. उपनिरीक्षक अस्मिता पाटील करीत आहेत.


## शिक्षक पाहिजेत

पनवेल एज्युकेशन सोसायटीचे नॅशनल उर्दु हायस्कूल, तळोजा मध्ये महाराष्ट्र शासनाचा **''मराठी फाऊंडेशन''** योजने अंतर्गत शै. वर्ष २०२४-२०२५ करिता (एम.ए.;बि. एड.) (स्पेशल मराठी) विषय असणाऱ्या शिक्षकाची गरज आहे. तरी इच्छुकांनी त्वरीत प्रभारी मुख्याध्यापकांशी संपर्क साधावा.

**श्रीमती परवीन ई. शेख.**
**मो. क्र.: ९८९२१३०१९६**

**सही/-**
**मुख्याध्यापक**
नॅशनल उर्दु हायस्कूल, तळोजा
ता. पनवेल, जि. रायगड


# केन्द्रीय विद्यालय ए.ए.डी. करंजा

आज़ादी का अमृत महोत्सव | G20

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र-४००७०४

**KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**

(An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India)
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad (MH)-४००७०४
दूरभाष/फॅक्स-022-27222132, ई-मेल-kvkaranja@gmail.com,
CBSE Aff.1100017 UDISE: 27241501112 Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in

वैबसाइट - https://nadkaranja.kvs.ac.in ईमेल: kvkaranja@gmail.com

## साक्षात्कार सूचना /Walk-In Interview

केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शौक्षिक वर्ष २०२४-२५ हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शौक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers) **(गणित, अर्थशास्त्र, अंग्रेजी)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |
| **प्रशिक्षित स्नातक शिक्षक** (TrainedGraduateTeachers) **(अंग्रेजी,हिन्दी)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातक डिग्री (बीए) एवं बी.एड डिग्री और सी.टी.ई.टी |
| **विशेष शिक्षक** (SPECIAL EDUCATOR) | सम्बंधित विषय में डिग्री/ स्नातक एवं संबन्धित विषय में डिप्लोमा |

**साक्षात्कार दिवस : 08.07.2024 (सोमवार)**
**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM

**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**सही/-**
**प्राचार्य**
**केवि एन. एडी करंजा**
**प्राचाय/Principal**
**केंन्द्रीय विद्यालय/Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / N-D Karanja**
**जिला-रायगढ़ (महाराष्ट्र)/Dist.-Raigad (MH.)**

## जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण

जनेप प्राधिकरण JNPA | INDIA'S BEST PERFORMING PORT

**प्रशासन विभाग**

जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण, कला, विज्ञान, वाणिज्य, लेखा आणि वित्त पदविधर ह्यासारख्या सामान्य प्रवाहांचे पदवीधरासाठी अप्रेंटिस कायदा १९६१ यानुसार खालीलप्रमाणे एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी उमेदवार घेऊ इच्छिते.

| क्र. स. | प्रशिक्षणाचा प्रकार | उमेदवारांची संख्या | उमेदवारांच्या प्रशिक्षणाची मुदत | प्रतिदरमहा विद्यावेतन |
|---|---|---|---|---|
| १. | कला पदविधर (Bachelor of Arts) | 07 (1 SC) | एक वर्ष | रु. ९,०००/- |
| २. | विज्ञान पदविधर (Bachelor of Science) | 08 (1-SC, 1-ST) | एक वर्ष | रु. ९,०००/- |
| ३. | वाणिज्य पदविधर (Bachelor of Commerce) | 15 (2-SC, 1-ST) | एक वर्ष | रु. ९,०००/- |
| ४. | लेखा आणि वित्त पदविधर (Bachelor of Accounting & Finance) | 15 (1-SC, 1-ST) | एक वर्ष | रु. ९,०००/- |

ज्या उमेदवारानी त्यांची पदवी (मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी पूर्ण केलेली पाहिजे) वर्ष २०२२ मध्ये किवा त्यानंतरच्या वर्षात उत्तीर्ण केले आहे, तेच उमेदवार फक्त उमेदवारीसाठी पात्र आहेत.

उमदेवारानी nats.education.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी, नोंदणी केलेले आपले अर्ज वरिष्ठ व्यवस्थापक (कार्मिक), जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, शेवा, तालुका उरण, जि. रायगड, नवी मुंबई ४००७०७ यांच्या कार्यालयात सर्व प्रमाणपत्रांसह दि. 18.07.2024 पूर्वी पाठवावेत. जेएनपीए प्रकल्पग्रस्त उमेदवाराला प्राधान्य देण्यात येईल. जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण मध्ये प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर उमेदवाराला नोकरी देण्याची कोणतीही हमी जेएनपीए प्रशासन देत नाही.

**वरिष्ठ व्यवस्थापक (कार्मिक)**

# लोधिवलीत कृषी दिन साजरा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली यांच्या वतीने कृषी दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.



ग्रामपंचायत कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर पुष्पांजली अर्पण करून ग्रामपंचायत हद्दीत वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी ग्रामपंचायत उपसरपंच रेखा भुईकोट, ज्येष्ठ ग्रामस्थ एकनाथ सांगळे, प्रभाकर सांगळे, ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब गोल्हार, ग्रामपंचायत कर्मचारी हजर होते.

## PUBLIC NOTICE

This is issued to inform the public that my client intends to purchase/transfer/assign/develop/redevelop/lease the property/parcels **of land** located at **Final Plot number 215, opposite the Royal Residency building, Mahatma Gandhi Road, Visharli Naka, Old Panvel, District Raigad 410206 Maharashtra.** The schedule of the properties is described herein as under.

**SCHEDULE OF PROPERTY**
**Land at Visharli Naka, Old Panvel, District Raigad**

| Sr. No. | Name of Land Holders | Final plot number. | Hec./r./Sqmt |
|---|---|---|---|
| 1 | M/s Banthia Parmar Associates | 215 | 1503.40 |

Any persons / organizations / banks / NBFCs desirous of opposing the same or having any claim whatsoever, mortgage, gift deed, lease, maintenance, transfer, agreement to sell, sale agreement, loan, court case or any other legal/paralegal proceedings may contact within 14 days with written proof and authenticated documents, the advocate at the address mentioned below. In the event no objection is raised, it will be presumed that the aforementioned parcel/parcels of land are free from any encumbrances and the title is clear and marketable and the aforementioned parcel /parcels of land shall be transferred/assigned in accordance with the law. No objections shall be entertained thereafter and the transactions pertaining to the land shall be rendered complete. Thereafter an unqualified title report shall be issued accordingly.

**Sd/-**
**Advocate Paramvir Narula, M.com. LLB**
**Sector 12, Bungalow 15 and 17, New Panvel East-410206, Mobile 9820623888 / 8080767471**

# ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद

## ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**जून २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ २ | संतोष गणपत परब/ सुजाता संतोष परब/ प्रिती संतोष परब | मे.होम ॲम्बिशन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | पवल२-२२११-२०२३ | ९/२/२०२३ | सदनिका नं. ००७, तळ मजला, ॲम्बिशन त्रिवेणी, मोजे शिलोत्तर रायचूर |
| | अविनाश दिलीप जाधव/ कोमल अविनाश जाधव | सुनिलकुमार सोहनलाल राजभर | पवल२-८७३८-२०२४ | २९/४/२०२४ | सदनिका नं. २०४, दुसरा मजला, ओम साई रेजेन्सी को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर |
| ३ | भारत तुकाराम कांबळे | प्रशांत भारत कांबळे | पवल२-१०५०१-२०२४ | २१/५/२०२४ | सदनिका क्र. ४, तळ मजला, बि.नं.जी २, वसुंधरा को.हौ.सो.,मौजे शिलोत्तर रायचूर |
| ४ | राजाराम मुरलीधर जोशी/ श्रद्धा राजाराम जोशी | संतोष गंगाराम राणे | पवल१-११०५५-२०२३ | २८/१२/२०२३ | सदनिका क्र. सी २०७, दुसरा मजला,सी विंग गंगा दर्शन को.हौ.सो., मौजे पाली देवद |
| ५ | चंद्रशेखर सिताराम वेलोंडे/ शितल चंद्रशेखर वेलोंडे/ ओमकार चंद्रशेखर वेलोंडे | पूजा चंद्रशेखर वेलोंडे | पवल२-५०७१-२०२४ | ११/३/२०२४ | सदनिका क्र. २०८, दुसरा मजला,बी विंग, श्री वसंतविहार को.हौ.सो.,मौजे शिलोत्तर रायचूर |
| ६ | भरत बाबूराव परीट | संतोष दत्तु खरात | पवल५-१३९६८-२०२३ | १/९/२०२३ | सदनिका क्र. ३०३, तिसरा मजला, ए विंग, प्रयाग आंगण को.हौ.सो.,मौजे शिलोत्तर रायचूर |
| ७ | नितीन बाळाराम शिंदे मिनाक्षी राजेश जाधव | राजेश रामचंद्र जाधव/ | पवल२-११४००-२०२४ | ३१/५/२०२४ | सदनिका क्र. ३०५, तिसरा मजला,ए विंग प्रयाग आंगण को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर |
| ८ | समीर महादेव पाटील/ जयश्री महादेव पाटील | नितीन रमेश माहूलकर/ हर्षद रमेश माहूलकर | पवल२-१३८६१-२०२३ | ७/८/२०२३ | सदनिका क्र. डी ५, तळ मजला, बि.नं.३/४, अजिंक्यतारा को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| ९ | अविनाश प्रकाश दळवी | भगवान सोमाजी शिरसाट/ सीमा भगवान शिरसाट | पवल५-२००७-२०२४ | ८/२/२०२४ | सदनिका क्र. के २८०४, २८ वा मजला,के विंग बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १० | सुभाष उत्तम बर्गे/ मेघा सुभाष बर्गे | भानुदास बाबू ठाकूर | पवल३-९२३२-२०२४ | १०/५/२०२४ | सदनिका क्र. ३ बी, तळ मजला,बि.नं.एंड-२ युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, प्रेरणा को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ११ | महेश दत्तात्रेय औटे/ श्वेता महेश औटे | भानुदास बी. ठाकूर | पवल२-९७२९-२०२४ | १०/५/२०२४ | सदनिका क्र. ०३ बी, तळ मजला,बि.नं.ए ६-२ युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, प्रेरणा को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| १२ | विठ्ठल पांडुरंग शिंदे/ शालन विठ्ठल शिंदे | मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लि.तर्फे अमित अरुण अंबुर्ले | पवल२-१०११८-२०२४ | १६/५/२०२४ | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला,ए विंग, अलंकापुरी रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद |
| १३ | राजू प्रेमसिंग राठोड/ रंजना राजू राठोड | वसंत देवराम वसईकर/ शोभा वसंत वसईकर | पवल२-१११६९-२०२४ | ३०/५/२०२४ | सदनिका क्र. ई ००२, तळ मजला, बि.नं.२, विठोबा कॉम्प्लेक्स को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| १४ | क्रिश प्रविण भरथन | वी. के. भाराथान | पवल३-५४०४-२०२४ | २१/३/२०२४ | सदनिका क्र. बी २०१, दुसरा मजला,बि.नं.ई २, स्नेहकुंज को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| १५ | हितेश भालचंद्र हांडीफोड/ लोपेश भालचंद्र हांडीफोड/ बामुबाई भालचंद्र हांडीफोड | सुखावेनी मधुकर शेट्टी/ प्रतिक्षा मधुकर शेट्टी | पवल२-७५६२-२०२४ | १५/४/२०२४ | सदनिका क्र. बी ३०४, तिसरा मजला,बी विंग गंगाधाम बि.नं. २ को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| १६ | इशान प्रविण भरथन यांच्या तर्फे अ.पा.क. आई नीलम बुधराणी | वी. के. भाराथान | पवल३-५४०५-२०२४ | २१/३/२०२४ | सदनिका क्र. बी २०२, दुसरा मजला,बि.नं. ई२, स्नेहकुंज को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| १७ | उज्ज्वला प्रकाश गोंजी/ अजिंक्य प्रकाश गोंजी | शिवनंदन व्ही पिल्लई/ श्रीदेवी एस. पिल्लई | पवल१-४४१५-२०२४ | १०/६/२०२४ | सदनिका क्र. ३०४, तिसरा मजला,श्रेयस होम्स को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| १८ | सविता रावसाहेब सांगळे | सचिन दत्ता भगत/ दत्तात्रय गणपतराव भगत | पवल२-२२०४-२०२४ | २/२/२०२४ | सदनिका क्र. ३०८, तिसरा मजला,के विंग, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १९ | सानिका सुजय घरत | सविता सुनिल अग्रवाल/ शिवम सुनिल अग्रवाल | पवल३-१८१९३-२०२२ | २७/१०/२०२२ | सदनिका क्र.१८०५, १८ वा मजला, आय विंग बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २० | जयंतराव श्रीधर मेढे/ पुष्पा जयंतराव मेढे | लिलाधर माया कारभारी/ नंदिनी अविनाश मोरे | पवल१-४५८५-२०२४ | १३/०६/२०२४ | सदनिका क्र.ई ०३, पहिला मजला, न्यू प्रेरणा को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर |
| २१ | उत्तम किसनराव शिंदे | ज्ञानेश्वर शिवराम मुकादम | पवल२-१०४३६-२०२४ | २१/०५/२०२४ | सदनिका क्र. १०२, पहिला मजला, माऊली दर्शन, मौजे पालीदेवद |
| २२ | वैशाली श्रीकांत कुंभार | किशोर चंद्रकांत पाटील | पवल१-३९४८-२०२४ | २८/५/२०२४ | सदनिका क्र. ०३, तळ मजला,बि.नं.जी १४, युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, न्यू सरस्वती को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर |
| २३ | मोहन रघुनाथ दळवी/ प्रशांत रघुनाथ दळवी | विनीत पंडीत | पवल३-११८६३-२०२४ | १३/०६/२०२४ | सदनिका क्र. १०३, पहिला मजला,ए विंग, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो.मौजे शिलोत्तर रायचूर |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# शिवसेनेच्या सदस्य नोंदणी प्रक्रियेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरूड :** शिवसेनेतर्फे १ ते १५ जुलैदरम्यान सदस्यनोंदणी करण्यात येणार आहे. उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे व तालुकाप्रमुख रूषिकांत डोंगरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य नोंदणीची सुरुवात सोमवारी (दि. १) करण्यात आली.

या वेळी बाबू सुर्वे, महेश भगत, निलेश घाटवळ, यशवंत पाटील आदींसह कार्यकर्त्यांनी शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारले. भरत बेलोसे व ऋषीकांत डोंगरीकर यांनी सांगितले की, आमदार महेंद्र दळवी व जिल्हाप्रमुख राजा केणी यांच्या मार्गदर्शनाखाली ही सदस्यनोंदणी सुरू करण्यात आली आहे.

## सिडको

शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व. श्री. दिनेश कुमार जवारा राम सेन व श्री. वसना लासु राम, राहणार - सदनिका क्र. २१०१, भूखंड क्र. २९४५, राऊत बिल्डींग, कारपेंटर दुसरी स्ट्रीट, गिरगाव, मुंबई - ४०० ००४ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. गजोरा इडिफिस प्रायव्हेट लिमिटेड तर्फे डायरेक्टर १. श्री. गोविंद करमन गजोरा २. दिपेश गोविंद गजोरा ३. पार्थ गोविंद गजोरा** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३५११ | २६.०६.२०२४ | पुष्पक नोड | २७ | ४० | १८४० | १३.०९.२०२३ | १८.०९.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/०४६/२०२४-२५

## निवडक



### कुरूळ दत्तटेकडी येथे वृक्षारोपण

**अलिबाग** : ग्रीन अलिबाग या संस्थेच्या वतीने दत्तटेकडी कुरूळ येथे रविवारी (दि.३०) विविध औषधी वनस्पती व निसर्गाला उपयुक्त अशा वृक्षांची लागवड करण्यात आली. वड, पिंपळ, अशोक, सुरू, उंबर, करंज, जांभूळ, सिताफळ अशी उपयुक्त व औषधी वृक्षाची लागवड करण्यात आली. संस्थेचे सदस्य प्रशांत पाटील याच्या मार्गदर्शनानुसार वृक्ष लागवड करण्यात आली. सर्व उपस्थित सदस्यांना हॉटेल गुरुग्रेसच्या वतीने नाष्टा व पाण्याची सोय करण्यात आली होती. त्यानंतर सर्व सदस्यांची दत्तमंदिर येथे बैठक होऊन पुढील कार्यक्रमाविषयी चर्चा केली.

### डॉ. सुनील मांजरेकरांचा दुबईत सन्मान



**अलिबाग** : तालुक्यात सारळ या गावचे मूळ रहिवासी असलेले डॉ. सुनील विनायक मांजरेकर यांचा नुकताच दुबईमध्ये प्रसिद्ध सिने अभिनेत्री मीनाक्षी शेशद्री यांच्या हस्ते दादासाहेब फाळके या मानाच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्काराने सन्मान करण्यात आला. डॉ. सुनील मांजरेकर हे गेली २५ वर्षे दुबईमध्ये उद्योजक म्हणून ओळखले जात आहेत. कृषी क्षेत्राशी निगडित उद्योगातून नवीन उद्योजकांना बाजार कसा उपलब्ध करावा, उद्योग व्यवसायातील स्किल यावर त्यांची कंपनी नवीन उद्योजकांना मार्गदर्शन करीत असते. दुबईतील मराठी फोरमचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. जीएमबीएफ या संस्थेच्या माध्यमातून मराठी उद्योजकांनी सुरू केलेल्या संस्थेचे ते अध्यक्ष आहेत.

### सीकेपी समाज अध्यक्षपदी समीर गुप्ते

**अलिबाग** : अखिल भारतीय चांद्रसेनीय कायस्थ प्रभू मध्यवर्ती संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत समिर गुप्ते यांचे नेतृत्वाखाली श्री एकविरा पॅनलचे सर्वच्या सर्व १२ उमेदवार प्रचंड मताधिक्याने निवडून आले. संस्थेच्या अध्यक्षपदी समिर गुप्ते, विश्वस्तपदी अरुणा कर्णिक, शिरीष चिटणीस, अशोक देशपांडे, संजय दिघे, नागेश कुळकण यांची तर उपाध्यक्षपदी सुरभी गडकरी, मंदार कुळकर्णी, चंद्रशेखर देशपांडे, तसेच कार्यकारी मंडळाचे सदस्यपदी वर्षा दिघे, चंद्रशेखर बेंद्रे, श्रीकृष्ण चित्रे हे निवडून आले. या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निनाद जयवंत व निलेश गुप्ते यांनी काम पाहिले.



# रेल्वेपुलाखालून जाणारा महामार्ग पाण्यात

## ढालघर ग्रामस्थांची शेतीही जलमय, रेल्वे आणि महामार्ग प्रशासनाचे दुर्लक्ष

**माणगाव : प्रतिनिधी**

गेली चार दिवस पडत असलेल्या अतिवृष्टीमुळे पाण्याचा निचरा होत नसल्याने मुंबई-गोवा महामार्गावरील ढालघर गावाजवळील रेल्वेपुलाखालून जाणाऱ्या या महामार्गावर पाणी साचत आहे. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनचालकांना हा रस्ता दिसत नाही. त्यामुळे अपघात होण्याची जास्त शक्यता आहे.



कोकण रेल्वे मार्गावरील ढालघर गावचे हद्दीतून मुंबई-गोवा महामार्ग गेला आहे. या महामार्गालगत संबंधित महामार्ग प्रशासनाने पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटार काढणे गरजेचे होते, मात्र गटार काढले नसल्याने पावसाचे पाणी तुंबत आहे. त्यामुळे ते महामार्गावरून वाहत आहे. रेल्वे भरावामुळे पावसाचे पाणी तुंबत असून ढालघर येथील ग्रामस्थांची शेती पाण्यात गेली आहे.

माणगावपासून तीन किमी अंतरावर ढालघर गावाजवळ कोकण रेल्वेमार्ग जातो. या कोकण रेल्वेमार्गावर रेल्वे प्रशासनाने पूल उभारला असून त्या पुलाखालून मुंबई-गोवा महामार्ग गेला आहे. रेल्वे पुलाखालून जाणाऱ्या महामार्गाचे दोन्ही बाजूंनी पाण्याचा निचरा होण्यासाठी रेल्वे प्रशासन किंवा महामार्ग प्रशासनाने गटार खोदणे गरजेचे होते, मात्र दोन्ही प्रशासनाने पाण्याचा निचरा करण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबले आहे. या तुंबलेल्या पाण्यामुळे ढालघर ग्रामस्थांची शेती ही संकटात सापडली आहे. किंबहुना शेतीचे नुकसान होत असल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न बुडाले आहे. याबाबत ढालघर ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

गेले चार दिवस सतत पडणाऱ्या अतिवृष्टीमुळे या परिसरात पाणी मोठ्या प्रमाणात तुंबले आहे. एका बाजूला कोकण रेल्वे मार्गाच्या भरावामुळे पाण्याचा निचरा होण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे हे पावसाचे पाणी महामार्गावरून वाहत आहे. मुंबई-गोवा महामार्ग हा सतत रहदारीचा असल्याने महामार्गावर विशेषतः पावसाळ्यात जास्त अपघाताचे प्रमाण वाढत आहे.

महामार्गावरून हे पाणी वाहत असल्याने वाहनचालकांना रस्ता दिसत नाही. याबाबत ढालघर ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रारी केल्या आहेत, मात्र या तक्रारीची दखल घेतली गेली नसल्याने ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## रोह्यातील शिबिरामध्ये १०५ जणांची नेत्रतपासणी

### २९ मोतीबिंदू रुग्णांचे ऑपरेशन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा येथील नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात सोमवारी (दि.१) १०५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २९ रुग्णांना आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. रोहा सिटिझन फोरमने गेल्या दीड वर्षभरात नेत्ररुग्णांच्या मोफत आणि यशस्वी शस्त्रक्रिया केल्याने तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या कमालीची वाढली आहे.



ग्रामदैवत श्री धावीर मंदिराच्या भक्तनिवासात शिबिर झाले. या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटपदेखील करण्यात आले. शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. सिद्धी वर्गीस, प्रतिभा गावित, समृद्धी साळवी, अवंतिका गलांडे, रेबेका मॅडम, विश्वनाथ पाटील, ज्ञानोबा कांबळे आदींनी रुग्णांची तपासणी केली, तर हॉस्पिटलकडून रेश्मा शर्मा, आदित्य सप्रे यांनी शिबिरास भेट दिली. रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक प्रदीप अप्पा देशमुख, महेश सरदार, संदीप सरफळे, श्रीकांत ओक, संतोष खटावकर, मिलिंद अष्टिवकर, इल्यास डबीर, दिनेश जाधव, दिनेश मोहिते, अहमद दर्जी, उस्मान रोहेकर, परशुराम चव्हाण, राजेश काफरे, निलेश शिर्के, शैलेश रावकर, अमोल देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

## माणगावच्या द.ग. तटकरे महाविद्यालयात डॉक्टरांचा सन्मान

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त व डॉक्टर्स डेचे औचित्य साधून सोमवारी (दि.१) तालुक्यातील डॉक्टरांचा संस्थेतर्फे अध्यक्ष ॲड.राजीव साबळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



या वेळी माणगाव मेडिकोजचे अध्यक्ष डॉ.अभिजित मेहता, डॉ. आबासाहेब पाटणकर, डॉ.सचिन चव्हाण, डॉ.संताजी यादव, डॉ. नितीश सावंत, डॉ.मोघल हसन, डॉ.सचिन मेहता, डॉ.आदेश घोणे, डॉ.सुनीता कोकणे, डॉ.क्षमा मेहता, डॉ.पूजा सावंत यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेचे संचालक तथा माजी नगरसेवक नितीन बामगुडे, विरेश येरुणकर, माणगावचे माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, द.ग. तटकरे महाविद्यलाय माणगाव प्राचार्य बबन खामकर, शिपूरकर इंग्रजी शाळेचे स्कूल कमिटी चेअरमन अरुण पवार, सुधाकर शिपूरकर व गणेश वाघरे इंग्रजी शाळा माणगाव प्राचार्या मनीषा मोरे, गंगुबाई शिंदे सीबीएससी स्कूल माणगाव प्राचार्या निशिगंधा मयेकर, प्राध्यपक तसेच कर्मचारी उपस्थित होते.

## उत्पादनावर प्रक्रिया करून नफा कमवा -तनुजा घाडगे

**चौक : प्रतिनिधी**

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन उत्पादन केलेल्या पिकावर प्रक्रिया करून नफा कमवा, असे आवाहन विभागीय तंत्र अधिकारी तनुजा घाडगे यांनी केले.



खालापूर कृषी विभाग आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.१) कृषी दिन साजरा करण्यात आला. त्या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. कृषितज्ज्ञ वसंतराव नाईक यांना कृषी विभाग, पंचायत समिती आणि उपस्थित शेतकरी यांच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. या वेळी सहाय्यक गटविकास अधिकारी राजपूत, कृषी अधिकारी खाडे, अधिक्षक संजीव चोपडे, खैर मंडळ कृषी अधिकारी नितीन महाडिक यांच्यासह कृषी कार्यालय आणि पंचायत समिती कार्यालय यांचे अधिकारी, कर्मचारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी पंचायत समितीच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

राज्यातील हरित क्रांतीचे जनक व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज कृषी दिन साजरा करण्यात येतो, असेही त्यांनी सांगितले. जगाच्या हरित क्रांती शर्यतीत टिकून राहण्यासाठी शेतीला तंत्रज्ञानाची जोड देणेही गरजेचे आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी शेतीचे अधिक उत्पादन घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन कृषी अधिकारी नारायण गोसावी यांनी केले.

## नांदगाव हायस्कूल येथे कृषी दिन साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

कृषी दिनाचे औचित्य साधून नांदगाव हायस्कूल येथे सोमवारी (दि.१) वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी शाळेच्या आवारात चिंच, आवळा, बहावा, निलगिरी आदी झाडांचे रोपण केले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून सांगताना पावसाचे प्रमाण वाढवण्यासाठी जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्याचा सल्ला दिला. या वेळी मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, सागर राऊत, महेश वाडकर, राहील घलटे, निशा बिरवाडकर, दत्ता खुळपे आदी उपस्थित होते.



## गोरठण येथे रोप लागवड आणि वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

प्रसोल केमिकल्स कंपनी, रसायनी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व ग्रुप ग्रामपंचायत गोरठण (ब्रु) यांच्या संयुक्त विद्यमाने गोरठण हद्दीमध्ये फणस, जांभूळ, वड, बदाम आदी वृक्षलागवड करून वृक्षवाटप करण्यात आले.



पर्यावरण संतुलनासाठी पाच हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला तसेच वृक्षसंवधनाची जबाबदारीही घेण्यात आली.

कार्यक्रमासाठी सरपंच रमेश पाटील, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अरुण जाधव, सदस्य सचिन वर्मा, तंटामुक्ती अध्यक्ष भालचंद्र पाटील, सदस्या शिल्पा झेमसे, प्रतीक्षा चाव्हण, माजी सरपंच एल. बी. पाटील, ग्रामसेविका प्रतिमा खैरे, रोहित इंगळे, संदीप पाटील, शिक्षक प्रसाद वाघमारे उपस्थित होते.

## डॉ. अशोक जाधव यांचा दिल्ली येथे सन्मान

**धाटाव** : रोह्यातील हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अशोक जाधव यांचा दिल्ली येथे टाईम्स नाऊ डॉक्टर डे कोन्क्लेव्ह २०२४चा लेजंड ऑफ मेडिसिन पुरस्कार केंद्रीय मंत्री विज्ञान व तंत्रज्ञान भारत सरकारचे डॉ. जितेंद्र सिंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कोरोना काळात डॉ. अशोक जाधव रात्री-अपरात्री केव्हाही नागरिकांची गैरसोय होऊ दिली नाही. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.



## ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयात सुधारित फौजदारी कायद्यांवर सेमिनार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुधारीत फौजदारी कायदे या विषयावरील सेमिनारचे शनिवारी (दि.२९) आयोजन करण्यात आले होते. या सेमिनारमध्ये १ जुलैपासून नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.



जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी आयपीसी, सीआरपीसी आणि आयईए या संहितांची बदललेली शीर्षके अनुक्रमे भारतीय न्याय संहिता २०२३ (बीएनएस), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ (बीएनएसएस) आणि भारतीय साक्ष अधिनियम २०२३ (बीएसए) या संदर्भात विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास करावा यासंदर्भात मार्गदर्शन केले.

सेमिनारमधील प्रमुख व्याख्याते अतिरिक्त सरकारी वकील तथा सहाय्यक सरकारी वकील अपिलेट साईड बॉम्बे हायकोर्ट डॉ. अविनाश अशोक नाईक यांनी मार्गदर्शन करताना आयपीसी आणि सीआरपीसी हे ब्रिटिशकालीन कायदे भारतीयांना गुन्हेगार ठरवणे आणि दंड किंवा शिक्षा ठरवणे यासंदर्भात होते. आता भारतीय न्यायसंहिता २०२३ आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ ही भारतीय शीर्षके कशी योग्य आहेत याबाबत सविस्तर माहिती दिले. पोलिसांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना म्हणजेच हातकडी घालणे, एफआयआर, झीरो एफआयआर, ऑडिओ, व्हिडीओ इलेक्ट्रिक मिन्सचा वापर, इलेक्ट्रॉनिक कॉपी तयार करणे, पंचनामा करताना फॉरेन्सिक टीमसोबत नेणे, पुरुषांप्रमाणेच स्त्रियांवरही समन्स बजाविणे, डेली डायरी संकलित करणे यासंदर्भात नव्याने ज्या तरतूदी करण्यात आल्या आहेत, याबाबत सविस्तर माहिती दिली. आता बलात्काराच्या केसमध्ये महिला मॅजिस्ट्रेट असणे बंधनकारक केले आहे हा महत्त्वाचा बदल विशद केला. त्याचबरोबर सेक्शन १२४(ए),१५३(ए), ३७७, ४९८(ए) याबाबत माहिती दिली. त्याचबरोबर नवीन सेक्शन ६९,७३,९५,२६४ याबाबत उदाहरणासहित मार्गदर्शन केले.


ॲड. विशाल भोईर यांनी भारतीय साक्ष अधिनियम २०२३मध्ये झालेले बदल उदा.दस्तऐवज कशाला म्हणावे, पुरावे, प्राथमिक आणि दुय्यम पुरावा, इलेक्ट्रॉनिक पुरावा आणि त्यांचे पुरावा म्हणून सादरीकरण कसे करावे इ.बाबत सविस्तर माहिती दिली. विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ॲड. नीलम हजारे यांनी प्रास्ताविक केले.

सेमिनारमध्ये जिल्ह्यातील सुमारे १०० पोलीस कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ॲड. नीलम हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. पियुषा पाटील, प्रा. चिन्मय राणे, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वीरित्या सेमिनारचे आयोजन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नीलम म्हात्रे यांनी तर सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रशिक्षण शाखा युवराज म्हसकर यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## नेणवली शाळेत वृक्षारोपणासह वाढदिवस साजरा

**पाली : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा नेणवली येथे सोमवारी कृषिदिनाचे औचित्य साधून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बांगारे व केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण करण्यात आले.



या वृक्षारोपणासाठी स्वरदिव्य वेलफेअर फाउंडेशन व ग्रीनटच नर्सरी यांचेमार्फत शेवगा, कडुलिंब, कांचन, कढीपत्ता, चाफा, सोनचाफा, आवळा, बेल अशी उपयुक्त रोपे उपलब्ध करून देण्यात आली. सर्वप्रथम वृक्षारोपण प्रतिज्ञा घेण्यात आली. तद्नंतर वृक्षदिंडी काढून झाडे आणण्यात आली. मुलांनीसुद्धा एक विद्यार्थी-एक झाड उपक्रम अंतर्गत काही झाडे आणली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोहर कोंडे, सर्व सदस्य, मुख्याध्यापक राजेंद्र अंबीके, विषयशिक्षक रवींद्र हंबीर, उपशिक्षक गणपत वरगडे व सर्व विद्यार्थी यांनी रोपे लागवड शालेय परिसरात केले.

नेणवली शाळेत विद्यार्थी दरवर्षी वृक्ष वाढदिवस आवडीने साजरा करीत असल्याने मुलांनी वृक्षाचे औक्षण करून झाडास फेर धरून वाढदिवस गीत गायले. सातवीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः चॉकलेट आणून वाढदिवस धमाल केली. मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी आजच्या दिनाचे महत्त्व व वृक्षनिगा, जोपासना याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**आज आम्ही वृक्ष तर लावलेच, पण त्याचा वाढदिवस साजरा करताना खूप मज्जा आली. चॉकलेट व केकसुद्धा वाटला.**
**-श्रेया मगर,**
**विद्यार्थीनी, नेणवली**

**रिमझिम पावसात मुलांच्या सोबत वृक्षारोपण कार्यक्रम व पर्यावरण संवर्धनाचा वसा खूपच आल्हाददायक वाटला.**
**- राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक**

# हार्दिक होणार भारताचा टी-२० कर्णधार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतासाठी टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर कर्णधार रोहित शर्माने टी-२० फॉरमॅटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. जेव्हा रोहित संघाबाहेर असायचा तेव्हा हार्दिक भारताचे कर्णधार म्हणून काम करायचा. त्यामुळे आता रोहितच्या जागी हार्दिकचे भारताचा पूर्णवेळ कर्णधार होणार का यावर बीसीसीआयचे सचिव जय शाह काय यांनी उत्तर दिले आहे.

टी-२०मधून निवृत्ती घेतल्यामुळे रोहित आता भारताच्या आगामी कोणत्याच टी-२० मालिकांसाठी संघाचा भाग नसेल. त्यामुळे आता बीसीसीआयने टी-२०मध्ये त्यांचा नवीन पूर्णवेळ कर्णधार कोण असणार यावर विचारप्रक्रिया सुरू केली आहे. हार्दिकचा विचार करता त्याने १६ टी-२० सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व केले आहे आणि त्यापैकी १०मध्ये त्यांना विजय मिळवून दिला आहे.

हार्दिक पांड्या टी-२० फॉरमॅटमध्ये रोहितचा उत्तराधिकारी असेल अशी चर्चा सुरू असताना, बीसीसीआयचे सचिव जय शाह म्हणाले की निवडकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर रोहितच्या बदलीची घोषणा केली जाईल. कर्णधारपदाचा निर्णय निवडकर्ते घेतील आणि



आम्ही त्यांच्याशी चर्चा करून त्याची घोषणा करू. तुम्ही हार्दिकबद्दल प्रश्न विचारला तर त्याच्या फॉर्मवर बरेच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते, पण आम्ही व निवडकर्त्यांनी त्याच्यावर विश्वास दाखवला आणि त्याने स्वतःला सिद्ध केले आहे.

टी-२०मध्ये भारतासाठी गेल्या काही काळात अनेक खेळाडूंनी कर्णधार म्हणून कामगिरी केली आहे. हार्दिक पांड्या त्यानंतर जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव आणि आता शुबमन गिलकडे भारताच्या टी-२० संघाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे भारताचा टी-२०मधील पुढील कर्णधार कोण असणार यावर चर्चा सुरू आहे.

टी-२० विश्वचषकानंतर ६ जुलैपासून भारत वि झिम्बाब्वेमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. नुकताच टी-२० विश्वचषक झाल्यामुळे वर्ल्डकपमधील बऱ्याच खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. परिणामी शुबमन गिलकडे झिम्बाब्वे मालिकेसाठीच्या भारतीय संघाचे नेतृत्त्व सोपवले आहे. झिम्बाब्वे दौऱ्यानंतर, भारत या महिन्याच्या अखेरीस श्रीलंकेचा दौरा करेल, जिथे ते तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहेत, मात्र या मालिकेचा कर्णधार अद्याप निश्चित झालेला नाही.


**नव्या प्रशिक्षकाबद्दलही उत्सुकता**

राहुल द्रविडने टी-२० विश्वचषकाची ट्रॉफी जिंकल्यानंतर टीम इंडियाच्या प्रशिक्षकपदाचाही निरोप घेतला आहे. या पार्श्वभूमीवर बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी सांगितले की, या महिन्याच्या अखेरीस श्रीलंकेत सुरू होणाऱ्या मर्यादित षटकांच्या मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघाला नवीन मुख्य प्रशिक्षक मिळेल, मात्र राहुल द्रविडची जागा नक्की कोण घेणार हे स्पष्ट केले नाही. क्रिकेट सल्लागार समितीने या पदासाठी मुलाखतीदेखील घेतल्या आहेत. मीडिया वृत्तानुसार गौतम गंभीर आणि माजी भारतीय महिला प्रशिक्षक डब्ल्यूव्ही रमन यांना शॉर्टलिस्ट केले आहे. द्रविडच्या जागी माजी सलामीवीर गौतम गंभीर भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्त होण्याची शक्यता आहे.

## भारतीय क्रिकेट संघाचे संसदेतही अभिनंदन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटच्या विश्वषकात अर्थात ट्वेंटी-२०मध्ये भारतीय संघाने



ऐतिहासिक कामगिरी केली. रोहित शर्माच्या नेतृत्वातील संघाने यंदाचा विश्वचषक जिंकला. या विजयानंतर सर्वत्र जल्लोष साजरा केला जात आहे. भारताच्या विजयानंतर संसदेतदेखील हा विषय पोहचला अन् लोकसभा अध्यक्षांनी संघाचे अभिनंदन केले.

भारतीय संघाच्या विजयानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह संपूर्ण सभागृहाने रोहित व त्याच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. भारतीय संघाचे अभिनंदन करताना बिर्ला म्हणाले की, भारतीय पुरुष क्रिकेट संघाने वेस्ट इंडिजमधील बार्बाडोस येथे ट्वेंटी-२० क्रिकेट विश्वचषक जिंकण्यात यश मिळवले हे तुमच्यासोबत शेअर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

ओम बिर्ला यांनी पुढे सांगितले की, या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण देशात उत्साह संचारला आहे. सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. हा विजय निःसंशयपणे आपल्या सर्व तरुणांना आणि सर्व खेळाडूंना प्रेरणा देईल. माझ्या स्वत:च्या वतीने आणि संपूर्ण सभागृहाच्या वतीने मी भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन करतो आणि भविष्यासाठी शुभेच्छा देतो.



## रोह्यात रंगली पावसाळी रबर बॉल क्रिकेट स्पर्धा | नवखार संघ विजेता

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रॉयल मित्र मंडळ धाटाव आयोजित पावसाळी रबर बॉल स्पर्धा पर्व २ नुकतीच रंगली. या स्पर्धेत ३२ संघानी सहभाग नोंदविला होता. नवखार संघाने विजेतेपद पटकावले.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला भाजपचे रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, धाटाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच यशवंत रटाटे, माजी सैनिक तुकाराम माने, राजेंद्र मोरे आदी उपस्थित होते.

प्रथम क्रमांक नवखार संघाचे पटकावले. द्वितीय क्रमांक रोहा रॉयल्स, तृतीय क्रमांक सनी इलेव्हन वरसे, चतुर्थ क्रमांक पाले बुद्रुक या संघांनी पटकावले. स्पर्धेत मालिकावीर म्हणून कृष्णा म्हात्रे (वरसे), उत्कृष्ट गोलंदाज शाकिब सिद्धिक (रोहा रॉयल्स), उत्कृष्ट फलंदाज अमर टावरी (नवखार), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक सुरज म्हात्रे (वरसे) याला गौरविण्यात आले.

स्पर्धेचे आयोजन निलेश म्हसकर, सिद्धांत मोरे, विशाल कदम यांनी केले होते. या वेळी रॉयल मित्र मंडळातर्फे भाजपचे रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांचा सन्मान करण्यात आला, तर घाग यांनी क्रिकेट खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला.

## ‘एमसीए’च्या राज्य पॅनलवर निवडीसाठी स्कोअरर्सची परीक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)ने राज्य पॅनलवर स्कोअरर्सना समाविष्ट करण्यासाठी जुलै व ऑगस्टमध्ये एक परीक्षा आयोजित करणार आहे. ही परीक्षा सर्व उमेदवारांसाठी खुली आहे.

परीक्षा शुल्क ५०० अधिक जीएसटी म्हणजे एकूण ५९० रुपये एवढे असेल. परीक्षेसाठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख ७ जुलै आहे. या तारखेनंतर प्राप्त झालेल्या नोंदणी स्वीकारल्या जाणार नाहीत.

नोंदणी फार्ममध्ये प्रदान केलेल्या एमसीए क्यूआर कोडवर पेमेंट करणे व पेमेंटचा पुरावा (स्क्रिनशॉट) अपलोड करणे आवश्यक आहे. नोंदणीच्या अंतिम तारखेनंतर सर्व उमेदवारांना अभ्यासक्रम, स्वरूप आणि परीक्षेचे वेळापत्रक कळवले जाईल. प्राप्त झालेल्या नोंदणीच्या संख्येवर अवलंबून एमसीए मुख्य राज्य पॅनल परीक्षेपूर्वी प्राथमिक तपासणी परीक्षा आयोजित करू शकते. नोंदणीमध्ये चुकीची माहिती दिली असल्यास किंवा परीक्षा शुल्क न भरल्यास नोंदणी न स्वीकारण्याचा अधिकार एमसीएकडे राहील.

अधिक माहितीसाठी संपर्क मंगेश नाईक (९८२३४३८९११) तसेच स्कोअरर्सच्या परीक्षेची नोंदणी करण्यासाठी लिंक https://bit.ly/mcascorers ही आहे.


दरम्यान, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व क्रिकेट स्कोअरर्सना एमसीए परीक्षा देण्याचे आवाहन केले आहे तसेच परीक्षेविषयी अधिक माहिती हवी असल्यास आरडीसीए सदस्य व जिल्ह्यातील एमसीए स्टेट पॅनल पंच ॲड. पंकज पंडित (८१४९२५२८२९) व सुयोग चौधरी (८१०४८८७९००) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविले आहे.

## ट्वेंटी-२० वर्ल्डकपमधील सर्वोत्तम संघाचा रोहित कर्णधार

### सहा भारतीय खेळाडूंचा समावेश

**दुबई : वृत्तसंस्था**

ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ मधील सर्वोत्तम संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केला आहे. या संघाचा कर्णधार रोहित शर्मा आहे, तर भारतीय संघातील सहा शिलेदारांचा संघात समावेश करण्यात आला आहे.



आयसीसीच्या सर्वोत्तम संघात भारतीय कर्णधार रोहित शर्मासह अफगाणिस्तानचा सलामीवीर रहमानुल्लाह गुरबाज, वेस्ट इंडिजचा स्फोटक खेळाडू निकोलस पूरन, भारताचा मिस्टर ३६० सूर्यकुमार यादव, ऑस्ट्रेलियाचा मार्कस स्टॉयनिस, अष्टपैलू हार्दिक पांड्या आणि अक्षर पटेल, अफगाणिस्तानचा कर्णधार राशिद खान, भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग आणि फझलहक फारूकी यांना संधी मिळाली आहे, तर बारावा खेळाडू म्हणून दक्षिण आफ्रिकेच्या एनरिक नॉर्तजेने जागा मिळवली.

भारताने दक्षिण आफ्रिकेचा सात धावांनी पराभव करून दुसऱ्यांदा ट्वेंटी-२० विश्वचषक उंचावला. तब्बल ११ वर्षांनंतर भारताला आयसीसीचा किताब जिंकता आला. दक्षिण आफ्रिकेविरूद्ध अंतिम सामन्यात अटीतटीच्या लढतीत अखेरच्या षटकात भारताने दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला. हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह यांची घातक गोलंदाजी; याशिवाय सूर्यकुमार यादवने डेव्हिड मिलरचा घेतलेला अप्रतिम झेल यामुळे सामन्याचा निकाल बदलला.

## ‘आरसीबी’च्या मार्गदर्शक आणि फलंदाजी प्रशिक्षकपदी दिनेश कार्तिक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारताचा माजी अनुभवी यष्टीरक्षक फलंदाज दिनेश कार्तिकवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कार्तिकची आयपीएल संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून मार्गदर्शक आणि फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आरसीबीने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर ही माहिती दिली.

गत आयपीएल संपल्यानंतर दिनेश कार्तिकने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली होती. निवृत्तीनंतर कार्तिकने टी-२० वर्ल्डकपमध्ये कॉमेंट्री करताना



दिसला. तो आता पुन्हा एकदा विराट कोहलीसोबत ड्रेसिंग रूम शेअर करणार आहे, मात्र या वेळी कार्तिकची भूमिका वेगळी असणार आहे.

कार्तिकने २५७ आयपीएल सामन्यात २६.३२च्या सरासरीने ४८४२ धावा केल्या आहेत. यात २२ अर्धशतकांचा समावेश आहे. आयपीएलमध्ये विकेटकीपिंग करताना त्याने १४७ झेल घेतले आहेत आणि ३७ वेळा स्टंपिंग केली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दिनेश कार्तिकचे रेकॉर्डही चांगले आहेत. भारतासाठी कार्तिकने २६ कसोटी सामन्यांमध्ये १०२५ धावा, ९४ एकदिवसीय सामन्यांमध्ये १७५२ धावा आणि ६० टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ६८६ धावा केल्या आहेत. त्याने कसोटी सामन्यात ६३ विकेट्स, एकदिवसीय सामन्यात ७१ आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ३६ विकेट्स घेतल्या आहेत.

### आयपीएलमध्ये नव्या भूमिकेत

दिनेश कार्तिक क्रिकेटच्या मैदानावर आरसीबीकडून खेळू शकणार नसला तरी ड्रेसिंग रूममध्ये तो या संघासाठी विजयी रणनीती नक्कीच बनवेल. गेल्या आयपीएल मोसमात कार्तिकने यष्टीरक्षक फलंदाज म्हणून १५ सामन्यात ३६.२२च्या सरासरीने ३२६ धावा केल्या. या काळात त्याने दोन अर्धशतके झळकावली होती.

## पती म्हणून तुझा अभिमान वाटतो!

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला नमवून टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले आहे. आयसीसी ट्रॉफी मिळवण्यासाठी गेली अनेक वर्ष सातत्याने प्रयत्न करीत असलेल्या कर्णधाराला आणि भारतीय संघाला अखेरीस यश आले. यानंतर रोहितची पत्नी रितिकाने एक भावूक पोस्ट इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. या पोस्टच्या कॅप्शनने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या पोस्टमध्ये रितिकाने लिहिलंय, रोहित, मला माहीत आहे की ही ट्रॉफी तुझ्यासाठी किती महत्त्वाची आहे. हा फॉरमॅट, चषक, खेळाडू, हा प्रवास आणि ती ट्रॉफी मिळवण्याचा संपूर्ण प्रक्रिया तू नेहमीच हे स्वप्न पाहिले आहेस.

### रोहितच्या टी-२० निवृत्तीनंतर रितिकाची भावूक पोस्ट



मला माहीत आहे की, गेले काही महिने तुझ्यासाठी किती कठीण गेले आहेत. तुझ्या मनावर आणि शरीरावर याचा किती परिणाम झाला हे मला माहीत आहे, पण तुला तुझे स्वप्न पूर्ण करताना पाहणे खूप भावूक करणारे आणि प्रेरणादायी आहे.

रोहितच्या निवृत्तीबद्दल रितिका म्हणते, तुझी पत्नी या नात्याने तू जे काही साध्य केलं आहेस आणि या खेळावर आणि या खेळावर प्रेम करणाऱ्या सर्वांवरच तुझा असलेला प्रभाव याचा मला खूप अभिमान आहे, पण तुला खेळताना पाहून आनंद मिळणारी एक व्यक्ती म्हणून या खेळाचा एक भाग मागे सोडताना तुला पाहताना वाईट वाटते आहे. मला माहीत आहे की हा निर्णय घेण्यापूर्वी तू या संघासाठी सर्वोत्तम काय आहे याचा खूप विचार केला असशील, पण तरीही तुला या फॉरमॅटपासून दूर जाताना पाहणे अवघड असणार आहे. मी तुझ्यावर खूप प्रेम करते आणि तुला माझे म्हणवून घेण्याचा मला अभिमान आहे!

## रोहित-ऋषभची ‘ती’ युक्ती ठरली टर्निंग पॉईंट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील टी-२० विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामना रोमहर्षक झाला. भारताने कडवी झुंज देत अखेरीस हा सामना सात धावांनी जिंकला आणि देशाला जेतेपद मिळवून दिले. दक्षिण आफ्रिकेने बार्बाडोसमधील केन्सिंग्टन ओव्हलवर झालेल्या अंतिम सामन्यात भारताविरुद्ध १७७ धावांचा यशस्वी पाठलाग करू पाहत होती, पण या प्रयत्नात दक्षिण आफ्रिकेच्या संघात फलंदाजीची खोली नसल्यामुळे भारत वरचढ ठरला. हेन्रिक क्लासेन तुफान फटकेबाजी करीत असल्याने सामना अधिक रोमहर्षक झाला, मात्र हार्दिक त्याला बाद केल्याने भारताच्या विजयाची शक्यता वाढली, पण तत्पूर्वी मैदानात अशी एक घटना घडली, ज्याकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले.

अखेरच्या ४२ चेंडूंमध्ये ६८ धावांची गरज असताना आफ्रिकेच्या आशा पूर्णपणे क्लासेन आणि डेव्हिड मिलरवर अवलंबून होत्या. मिलरने कुलदीप



यादवला लागोपाठ चौकार लगावले, तर अक्षर पटेलच्या स्पेलमधील शेवटच्या षटकात क्लासेनने २४ धावा केल्या. समीकरण ३० चेंडूत ३० धावांवर येऊन पोहचले. सामन्यावर वर्चस्व असलेला भारतीय संघ यानंतर दबावाखाली आला होता. अगदी विजयाचा अंदाजही दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने होता आणि त्यांना विजयाची जवळपास ९० टक्के संधी होती, पण १७व्या षटकात हार्दिकने क्लासेनला बाद केल्याने भारताने पुनरागमन केले. बुमराहने दोन किफायतशीर षटकेही टाकली आणि सामना पुन्हा भारताच्या हातात आला.

हार्दिक आणि बुमराह यांनी भेदक गोलंदाजी करीत चांगली कामगिरी केल्याचे श्रेय भारताला दिले जात असताना कर्णधार रोहित शर्मा आणि ऋषभ पंत यांच्या युक्तीकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले, पण सामन्याच्या वेळी भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्या समालोचनामध्ये त्यांनी याचा उल्लेख केला.

बुमराहच्या तिसऱ्या षटकानंतर जेव्हा दक्षिण आफ्रिकेला शेवटच्या २४ षटकांमध्ये २६ धावांची गरज होती आणि क्लासेन आपल्या विस्फोटक अंदाजात फलंदाजी करत होता, तेव्हा पंतने मेडिकल टाइम-आउट घेतला. फिजिओ त्याच्या गुडघ्याभोवती पट्टी गुंडाळण्यासाठी मैदानावर आला. यामुळे सामना सुरू व्हायला काही मिनिटांचा वेळ गेला आणि यादरम्यान कर्णधार आणि इतर खेळाडूंनी रणनीती आखली तसेच आफ्रिकेच्या फलंदाजांच्या फॉर्मवरही याचा परिणाम झाला.

काही मिनिटांनंतर सामना पुन्हा सुरू झाला आणि क्लासेनला पहिल्याच चेंडूवर ऋषभ पंतकरवी हार्दिकने बाद केले, ज्यामुळे अखेरीस दक्षिण आफ्रिकेची खालची फळी कोलमडली. यानंतर बुमराहने पुढच्या षटकात मार्को यानसेनला बाद केले, तर हार्दिकने अखेरच्या षटकात आणखी दोन विकेट घेत संघाला विजय मिळवून दिला. यासह भारताने सात धावांनी सामना जिंकून टी-२० वर्ल्डकप ट्रॉफीही उंचावली.

## भारतीय महिलांचा द. आफ्रिकेवर विजय

**चेन्नई : वृत्तसंस्था**

सलामीवीर शफाली वर्माचे दमदार द्विशतक, स्मृती मंधानाची शतकी खेळी आणि स्नेह राणाची अप्रतिम गोलंदाजी याच्या जोरावर भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेवर १० गडी राखून विजय मिळवला.

प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ६ बाद ६०३ धावांवर डाव घोषित केला. त्यानंतर आफ्रिकेचा पहिला डाव २६६ धावांवर, तर दुसरा डाव ३७३ धावांवर आटोपला. त्यामुळे भारताला शेवटच्या डावात केवळ ३७ धावांचे आव्हान होते. हे आव्हान भारतीय महिला संघाने चौथ्याच दिवशी पार केले आणि संघाला मोठा विजय मिळवून दिला.

पहिल्या डावात शफाली वर्माच्या २०५ धावा आणि स्मृती मंधानाच्या १४९ धावांच्या बळावर भारताने ६०३ धावापर्यंत मजल मारली. या आव्हानाचा



पाठलाग करताना भारताच्या स्नेह राणाने अप्रतिम गोलंदाजी केली. तिने ७७ धावा देऊन आठ विकेट्स घेतल्या. आफ्रिकेकडून मारिझेन काप हिने ७४. तर सुने लूझ हिने ६५ धावा केल्या.

फॉलो-ऑनचा खेळ पुढे सुरू करताना दुसऱ्या डावात कर्णधार लॉरा वूल्फार्डने १२२ आणि सूने लूझ हिने १०९ धावा केल्या. त्यामुळे आफ्रिकेने दुसऱ्या डावात ३७३ धावा केल्या, पण त्यांच्या दोन्ही डावांची बेरीज भारतापेक्षा केवळ ३७ धावाच जास्त झाली. त्यामुळे भारताला मिळालेले हे आव्हान सलामीवीरांनी ९.२ षटकांतच पूर्ण केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com